नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १६३ * * अकोला * मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## दिल्लीतील हवा पुन्हा जीवघेणी : उड्डाणे रद्द

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :
वेस्टर्न डिस्टर्बन्सचा प्रभाव कमी झाल्याने दिल्लीतील हवा थांबली. यामुळे राजधानी रविवारी थंडी, धुरके आणि प्रदूषणाच्या तिहेरी हल्ल्याच्या विळख्यात सापडली. ग्रॅप-4 लागू असूनही, वझीरपूर आणि रोहिणी परिसरात अदक 500 च्या पातळीवर पोहोचला. प्रदूषक कण वातावरणात अडकून राहिले आणि राजधानी गॅस चेंबर बनली.

अक्षरधामसह अनेक भागांमध्ये दृश्यमानता 50 मीटरपर्यंत कमी झाली. धुक्यामुळे 40 विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली. डॉक्टरांनी लहान मुले, वृद्ध आणि श्वसनाचे आजार असलेल्या रुग्णांना सावधगिरी बाळगण्यास सांगितले आहे.

अग्राग्रलेख

### खरीखरी...

## महानगरपालिका जागृत होणार

गेल्या अनेक वर्षांपासून लोकनियुक्त नगरसेवक नसल्यामुळे राज्यातील सर्व महानगरपालिकांचा कारभार नोकर शहांच्या हाती होता. होणार, होणार म्हणून महानगरपालिकेच्या निवडणुकीची आशा दाखवण्यात आली होती पण निवडणुकीचा मुहूर्त काही साधून येत नव्हता. मात्र यावेळी अपेक्षाभंग झाला नाही आपल्या निवडणूक आयोगाने चक्क निवडणुकीची घोषणाच करून टाकली. या महापालिकांच्या निवडणुकांमुळे अनेक इच्छुकांना आशेची गंगा वाहताना दिसत आहे. लोकसभा काय किंवा विधानसभा काय यांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी नियमितपणे होतात, मग महानगरपालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या बाबतीतच नेमकी माशी कुठे शिंकते असा अनेकांचा आक्षेप होता. यावेळी माशी शिंकली नाही आणि एकदाची घोषणा झाली. अशीच घोषणा मागच्या टप्प्यातील नगरपालिकांच्या वेळीही झाली होती तेव्हा मात्र काही ठिकाणी माशी शिंकली. जिथे माशी शिंकली तेथील मतदान आता होणार आहे. ज्यांचे मतदान झाले आहे त्यांचे निकाल जाहीर अजून करण्यात आलेले नाहीत, ते बिचारे उमेदवार उमेदीच्या भोवऱ्यात गरगर फिरत आहेत. त्यांचा उद्धार होण्याला आणखी काही दिवस उरलेले आहेत असो. महानगरपालिकेच्या निवडणुका ठरलेल्या नियमित कालावधीत झाल्या पाहिजेत असे कोणालाही वाटले स्वाभाविक आहे. परंतु गंमत अशी आहे की, आपल्या देशात प्रत्येक गोष्टीत जात आणि राजकारण येत असते मग, या ना त्या कारणाने निवडणुका लांबतात हे आपण बऱ्याचदा बघितलेले आहे. नगरपालिका झाल्या, महानगर पालिकाही होतील तरी अजून जिल्हा परिषदेचे भिजत घोंगडे कायमच आहे हे भिजलेले घोंगडे अजून किती दिवस भिजतच राहते, हे फक्त बघत राहणे इतकेच आपल्या हाती आहे. मुंबईसारखी महानगरपालिका गेली कित्येक वर्ष शिवसेनेच्या व्याघ्रजालात बांधलेली होती. मुंबई केंद्रशासित करणार, अशी आवई ज्यावेळी उठली तेव्हा स्वर्गीय वसंतदादा पाटील महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मुंबई केंद्रशासित होणार या घोषणेचा भावनिक फायदा घेऊन तेव्हा बाळासाहेबांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने मुंबईचा गड जिंकला हे सर्वज्ञात आहे. मुंबई महापालिकेचे बजेट केरळ सारख्या अनेक राज्यांपेक्षा मोठे असते. सर्व राज्य सरकारे आणि अनेक महापालिका आज कर्जाच्या विळख्यात आहेत. अशावेळी ८० ते ९० हजार कोटींच्या मुदत ठेवी मुंबई महानगर पालिकेकडे आहेत, हे मुंबई महापालिकेचे वैभवच आहे असे समजले पाहिजे. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील अति श्रीमंत असलेली ही महापालिका आता दुभंगलेल्या शिवसेनेला जिंकता येईल काय, हा प्रश्न सर्वांच्याच मनात असेल. बदल होणे हे नैसर्गिक आहे कारण तो सृष्टीचा नियम आहे. संपूर्ण देशावर राज्य करणाऱ्या काँग्रेसलाही आता कशी परिस्थिती आली आहे हे आपण बघतोच आहोत. मुंबई महानगर पालिकेबरोबरच राज्यातील इतर सर्व महानगर पालिकांच्या निवडणुका घेण्यात येणार आहेत. या सर्व महानगर पालिकांच्या उत्पन्नाची बेरीज केली तरी मुंबई महा पालिकेपेक्षा कमीच भरेल. पण तरीही प्रत्येकाची आपली मनोकामना असते. त्या मनोकामनेनुसार राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, ठाणे यांच्यासारख्या सर्व महापालिकांच्या निवडणुकीचे वेध आता सर्वांनाच लागलेले आहेत. आजच्या परिस्थितीनुसार यापुढे आता पैशांचा खेळ सुरू होणार आहे, ज्याच्याकडे लाखो-करोडो रुपये असतील तोच निवडणूक लढवू शकतो. तेव्हा आता मतदारांनी आगामी महिनाभर महाराष्ट्राच्या महानगरात महा मतदानासाठी सज्ज झाले पाहिजे. गेले अनेक वर्षे अगदी आ वासून निवडणुकीच्या घोषणेची वाट बघणाऱ्या कितीतरी माजी आणि भावी नगरसेवकांना सेवेची संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. हा सेवेचा मार्ग ज्यांच्यासाठी यशदायी ठरणार आहे, त्या सर्व नगरसेवकांना आणि महापालिकेतील भावी लोकप्रतिनिधींना आमच्याकडून आधीच शुभेच्छा प्रदान करतो. भावी काळात महाराष्ट्रातील सर्व महापालिका आपली भूमिका पार पाडण्यासाठी निश्चितपणे जीवाची बाजी लावतील, याबाबत आज तरी शंका घेण्याचे कारण नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# राज्यातील महापालिका निवडणुकांचा अखेर बिगुल वाजला!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
राज्य निवडणूक आयोगाने आज मुंबईसह राज्यभरातील 29 महापालिका निवडणुकांची घोषणा केली. त्यानुसार 15 जानेवारी 2026 रोजी निवडणूक होणार असून, दुसऱ्या दिवशी म्हणजे 16 जानेवारी 2026 रोजी मतमोजणी होणार आहे. या घोषणेसह या महापालिकांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील 29 महापालिकांच्या निवडणुका मागील 5 ते 7 वर्षांपासून किंवा त्याहून अधिक कालावधीपासून प्रलंबित होत्या. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला. त्यामध्ये सुरुवातीला 2 डिसेंबर रोजी नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या निवडणुका घेण्यात आल्या. आता त्यानंतर राज्यातील प्रलंबित 29 महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला.

राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या निवडणूक वेळापत्रकानुसार, 23 ते 30 डिसेंबरपर्यंत उमेदवारांना आपली उमेदवारी दाखल करता येईल. त्यानंतर 31 डिसेंबर रोजी अर्जांची छाननी केली जाईल. 2 जानेवारी 2026 ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख आहे.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 3 जानेवारी 2026 रोजी अंतिम उमेदवारी यादी जाहीर केली जाईल, तसेच उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करता येईल. त्यानंतर 15 जानेवारी 2026 रोजी मतदान, तर त्यानंतर दुसऱ्या दिवशी 16 जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित होईल.

### मुंबईसह २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान : १६ जानेवारीला निकाल




**निवडणुकीचा कार्यक्रम**

| | |
|---|---|
| उमेदवारी दाखल | 23 ते 30 डिसेंबर |
| उमेदवार अर्जांची छाननी | 31 डिसेंबर |
| उमेदवारी मागे घेण्याची मुदत | 2 जानेवारी 2026 |
| निवडणूक चिन्ह वाटप व अंतिम उमेदवार यादी | 3 जानेवारी 2026 |
| मतदान | 15 जानेवारी 2026 |
| मतमोजणी | 16 जानेवारी 2026 |

**२९ महापालिकांत २८६९ जागा**

आयोगाच्या माहितीनुसार, मुंबईसह 29 महापालिकांतील 2869 जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. यात 1442 महिला उमेदवार आहेत. त्यात अनुसूचित जातीच्या 341, एसटीच्या 77 व नागरिकांचा मागास प्रवर्गातील 759 महिला उमेदवारांचा समावेश आहे.

**१ जुलै २०२५ ची मतदार यादी**

या निवडणुकीसाठी 1 जुलै 2025 ची मतदार यादी वापरण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. मतदार यादीत दुबार नावे असणाऱ्या मतदारांच्या नावापुढे डबल स्टार चिन्ह असेल.

या मतदारांना कोणत्याही एका मतदान केंद्रावर मतदान करता येईल. संभाव्य दुबार मतदारांच्या घरी जाऊन पाहणी केली जाईल. मुंबईत 10, 111 मतदान केंद्र असतील, असे ते म्हणाले.

## निवडणूक आयोग कार्यालयात मनसेची तोडफोड



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
मतदार याद्यांमधील कथित घोळामुळे संतप्त झालेल्या मनसेच्या कार्यकर्त्यांनी कळवा स्थित निवडणूक आयोगाच्या कार्यालयात तोडफोड केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेपूर्वी हा प्रकार घडला. मतदार याद्यांमधील कथित घोळांमुळे त्यांनी हे आक्रमक पाऊल उचलल्याचे सांगण्यात येत आहे.

मनसे कार्यकर्ते सकाळी 11 वाजल्यापासून कळवा स्थित निवडणूक आयोगाच्या कार्यालयात उपस्थित होते. तिथे त्यांनी मतदार याद्यांमधील त्रुटींवर आक्षेप घेत आंदोलन सुरू केले होते. मतदार यादीत अनेक मतदारांची नावे दुबार आलेली आहेत. तसेच जे मतदार हयात नाहीत, त्यांची नावेही यादीत आहेत. जिथे सपाट जमिनी आहेत, तिथे इमारती दाखवून मतदारांची नावे नोंदवण्यात आली आहेत, अशा अनेक तक्रारी त्यांच्या होत्या.

मनसे कार्यकर्त्यांनी या संदर्भात निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना अधिकाऱ्यांकडून कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. अधिकाऱ्यांनी केवळ 'तुमचे प्रश्न सोडवले जात आहेत,' असे दाखवण्याचा प्रयत्न केला.

यावेळी निवडणूक आयोगाची अधिकृत वेबसाइटही चालत नव्हती. या प्रकारामुळे कार्यकर्त्यांच्या संतापाचा कडेलोट झाला आणि त्यांनी कार्यालयात तोडफोड करायला सुरुवात केली. मनपा निवडणुकीच्या तोंडावर घडलेल्या या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेवर आणि कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

## पुण्यात स्वबळावर लढणार



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :
राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत आगामी महापालिका निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

फडणवीस म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकीच्या तारखा घोषित केल्या आहेत. 15 जानेवारीला सगळ्या महानगरपालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. कारण, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था ही प्रशासकांच्या भरवशावर चालवणे हे लोकशाहीला अभिप्रेत नव्हते. तथापि न्यायालयाच्या निर्णयामुळे दीर्घकाळ या संस्था निर्वाचित प्रतिनिधींच्या विना होत्या.

आता पुन्हा या निवडणुका होत आहेत आणि आम्हाला विश्वास आहे की या निवडणुकांमध्ये आमच्या शासनाने केले काम पाहता पुन्हा कौल आमच्या बाजूने येईल आणि जनता शहर विकासाची संधी आम्हाला देईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

फडणवीस म्हणाले, आम्ही महायुती करण्याचा प्रयत्न करत आहोत. जास्तीत जास्त ठिकाणी भाजप आणि शिवसेनेची युती होईल, काही ठिकाणी भाजप शिवसेना राष्ट्रवादी युती होईल, एखाद दोन ठिकाणी भाजप-राष्ट्रवादी युती देखील होईल.

## मोदी तेरी कब्र.... घोषणेवरून संसदेत गदारोळ

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :
संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या ११ व्या दिवशी सोमवारी दोन्ही सभागृहांमधील भाजप खासदारांनी काँग्रेसच्या रॅलीत पंतप्रधान मोदींविरुद्ध घोषणाबाजीचा मुद्दा उपस्थित केला.

केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनी राज्यसभेत म्हटले की, पंतप्रधानांविरुद्ध अशा गोष्टी बोलणे आणि त्यांच्या मृत्यूची कामना करणे हे लज्जास्पद आहे. नड्डा म्हणाले की, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस संसदीय पक्षाच्या (सीपीपी) अध्यक्षा सोनिया गांधी यांनी संपूर्ण देशाची माफी मागावी.

केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, १.४ अब्ज भारतीय आणि जगातील सर्वात प्रसिद्ध नेत्याला अशा घोषणाबाजीचा सामना करावा लागतो यापेक्षा लज्जास्पद काय असू शकते.

## पीयूष गोयल तामिळनाडूचे प्रभारी



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १५ :
भाजपने सोमवारी तामिळनाडू आणि आसाम विधानसभा निवडणुकांसाठी प्रभारी आणि सह-प्रभारी नियुक्त केले. वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांची तामिळनाडूसाठी निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. तर, भाजप खासदार बैजयंत पांडा यांच्याकडे आसाम विधानसभा निवडणुकीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दोन्ही राज्यांमध्ये 2026 मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत.

तामिळनाडूसाठी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि केंद्रीय सहकारिता आणि नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना निवडणूक सह-प्रभारी बनवण्यात आले आहे. राज्यात सध्या द्रविड मुन्नेत्र कळघम आणि काँग्रेसचे सरकार आहे. तर आसाममध्ये जम्मू-काश्मीर विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुनील कुमार शर्मा आणि माजी केंद्रीय मंत्री दर्शनाबेन जरदोश यांची सह-प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## प्रामाणिक अधिकाऱ्याला किती छळणार?



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्यावर नागपूर अधिवेशनात झालेल्या आरोपानंतर त्यांनी प्रथमच माध्यमांसमोर मत व्यक्त केले आहे. "मी झुकलो नाही, म्हणून माझ्यावर खोटे आरोप करून सातत्याने कट रचले जात आहेत. चौकशीत 'क्लीन चिट' मिळूनही तेच तेच आरोप उकरून काढणे, ही एका प्रामाणिक अधिकाऱ्याची मानसिक छळवणूक नाही का?," अशा शब्दांत तुकाराम मुंढे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

मुंढे यांनी नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नसतानाही नियमबाह्यपणे प्रकल्पाचा प्रभार स्वतःकडे घेतला. तसेच, 20 कोटींहून अधिक रकमेचा भ्रष्टाचार केल्याचा दावा, शिवाय पाच दिवसांचे बाळ असलेल्या एका महिला अधिकाऱ्याला सक्तीने कामावर बोलावणे आणि नस्तीवर सही न केल्याने दुसऱ्या एका महिला अधिकाऱ्याला अर्वाच्य भाषेत सुनावणे, असे आरोप भाजपचे आमदार कृष्णा खोपडे, प्रवीण दटके आणि प्रताप अडसड यांनी केले होते.

या संदर्भात भाजप आमदार कृष्णा खोपडे यांनी विधानसभेत हक्कभंग आणि कारवाईची मागणी केल्यानंतर वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अखेर मौन सोडले. मी कोणतेही नियमबाह्य काम केले नसून, प्रामाणिक अधिकाऱ्याला विनाकारण त्रास देण्याचा हा प्रकार असल्याचे ते म्हणाले.

## महानगर पालिका निवडणुकीत दुबार मतदार कसे टाळणार?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
राज्यातील महानगर पालिकांच्या निवडणुका आज अखेर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्या आहेत. महानगर पालिका निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्यापूर्वी राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दुबार मतदारांच्या मुद्द्यावरदेखील भाष्य केलं. त्यासाठी मुंबई महानगर पालिका निवडणुकांची माहिती त्यांनी सविस्तर सांगून त्यानंतर दुबार मतदारांसाठीची प्रक्रिया सांगितली.

मुंबई महानगर पालिका निवडणुकांसाठीची मतदान यादी प्रभागनिहाय विभाजित करण्यात आली आहे. ही मतदार यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून घेण्यात आलेली आहे. त्यातील कोणतेही नाव वगळणे किंवा समाविष्ट करणे याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला नाहीत. पण चुकून एका प्रभागातील मतदार दुसऱ्या प्रभागात गेले असतील, तर ते बदल करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला आहे.



या यादीत संभाव्य दुबार मतदारांच्या नावासमोर दोन स्टार मार्क करण्यात आले आहेत. महापालिका आयुक्तांमार्फत अशा मतदारांच्या घरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले आहे. तो मतदार कोणत्या मतदान केंद्रांवर मतदान करेल हे लिहून घेतलं आहे. त्यानुसार त्याच मतदान केंद्रावर त्याला मतदान करू दिले जाईलह्, असं निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले.

काही मतदारांनी या मोहिमेला प्रतिसाद दिला नाही. असे दुबार मतदार जर मतदान केंद्रावर आले, तर त्यांच्याकडून हमीपत्र लिहून घेतले जाईल, त्यांची ओळख पटवून घेतली जाईल आणि त्यानंतरच त्यांना मतदान करता येईल.


## तुमची KYC अद्ययावत ठेवा
ज्यामुळे तुमच्या बँकिंग सेवा चालू राहतील



**जर तुमचा KYC तपशील बदलला नसेल तर,**
पत्र/ऑनलाइन बँकिंग/मोबाइल बँकिंग/एटीएम/तुमच्या बँक किंवा बिझनेस करस्पाँड्ंट्सकडे (बीसीज) रजिस्टर असलेल्या तुमच्या मोबाइल नंबर/ ईमेलद्वारे Re-KYC साठी स्व-घोषणा सादर करा.

**जर तुमचा KYC तपशील बदलला असेल तर,**
अपडेटची माहिती देणाऱ्या कोणत्याही कागदपत्राची एक प्रत द्या: आधार/मतदाता ओळखपत्र/ NREGA जॉब कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स/पासपोर्ट/ नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टरने जारी केलेलं पत्र.

**आपल्या बँकेच्या जवळच्या शाखेत जाऊनही KYC अपडेट करू शकता.**




अधिक माहितीसाठी,
https://rbikehtahai.rbi.org.in/KYC वर जा
अधिकृत व्हॉट्सअॅप नंबर्स:
99990 41935/99309 91935

सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

# आरोपींच्या सोयीने चौकशीचा फार्स

## पुण्यातील जमीन प्रकरणात अंबादास दानवेंचा सरकारवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
पुण्यातील मुंढवा परिसरातील बहुचर्चित जमीन गैरव्यवहार प्रकरणाने आता राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडवली आहे. या प्रकरणात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीवर गंभीर आरोप होत असतानाही, त्यांच्यावर कोणतीही थेट कारवाई न झाल्यामुळे सरकारवर विरोधकांकडून जोरदार टीका होत आहे.

अमेडिया कंपनीमध्ये पार्थ पवार यांची 99 टक्के मालकी असल्याचे स्पष्ट असतानाही, कारवाई केवळ 1 टक्का भागीदार असलेल्या दिग्विजय पाटील यांच्यापुरती मर्यादित असल्याचे चित्र समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि विधानपरिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी संतप्त प्रतिक्रिया देत या चौकशी प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमधून या प्रकरणातील कथित दुटप्पीपणावर बोट ठेवले आहे. त्यांनी म्हटले आहे की, पुण्यातील हे जमीन प्रकरण म्हणजे आरोपींच्या सोयीने चालणाऱ्या चौकशीचा फार्स आहे.



अशा प्रकारची चौकशी यापूर्वी कधीच पाहायला मिळाली नाही. दानवे यांनी पुढे नमूद केले की, न्यायालयाने कानउघाडणी केल्यानंतरही अमेडिया कंपनीतील 99 टक्के भागीदार असलेल्या व्यक्तीवर गुन्हा दाखल होत नसेल, तर ही बाब अत्यंत गंभीर आहे. सरकार कोर्टाच्या आणखी कोणत्या विशेष निदेशांची वाट पाहत आहे, असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. त्यांच्या या पोस्टमुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिक तापले असून, सत्ताधा?यांच्या भूमिकेवर संशयाची सुई रोखली जात आहे.

दरम्यान, या प्रकरणात अमेडिया कंपनीचा 1 टक्का भागीदार असलेला दिग्विजय पाटील यांना पुणे पोलिसांनी चौकशीसाठी पुन्हा एकदा बोलावले आहे. मात्र, आजपर्यंत तीन वेळा चौकशीसाठी समन्स देऊनही ते पोलिसांसमोर हजर राहिलेले नाहीत. प्रत्येक वेळी त्यांनी वेगवेगळी कारणे देत चौकशी पुढे ढकलल्याचे समोर आले आहे.

कधी कौटुंबिक कार्यक्रमाचे कारण, तर कधी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत त्यांनी चौकशी टाळल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, अजित पवारांचे पुत्र जय पवार यांच्या लग्नाचा दाखला देत एका वेळेस त्यांनी गैरहजेरी लावली होती. आज, सोमवारी, ते चौकशीला हजर राहणार असल्याची माहिती समोर येत असली, तरी प्रत्यक्षात ते येणार की नाही, याबाबत अजूनही संभ्रम कायम आहे.

या संपूर्ण प्रकरणात आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, संबंधित जमीन पार्थ पवार आणि दिग्विजय पाटील यांच्या अमेडिया कंपनीला पॉवर ऑफ अटर्नीच्या माध्यमातून देण्यात आली होती. या प्रक्रियेत प्रमुख अधिकारपत्रधारक म्हणून शीतल तेजवानी यांची भूमिका होती.

पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने शीतल तेजवानी यांना अटक केली असून, त्यांची कसून चौकशी सध्या सुरू आहे. त्यांची पोलिस कोठडी आज संपणार असून, त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. या चौकशीतून अनेक महत्त्वाच्या कागदपत्रांची पडताळणी सुरू असून, ० निर्णयप्रक्रियेबाबत पोलिसांकडून माहिती गोळा केली जात आहे. मात्र, या सर्व कारवाईतून पार्थ पवार यांचे नाव थेट पुढे न येणे, हेच विरोधकांच्या टीकेचे मुख्य कारण ठरत आहे.

## आम्ही अल्लाहशिवाय इतरांसमोर डोके टेकवू शकत नाही



■ मुंबई : धर्म, श्रद्धा आणि देशभक्ती या विषयांवर सुरू असलेल्या चर्चांमध्ये समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी विधानसभेत आणि सार्वजनिक मंचावर मांडलेली भूमिका सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. वंदे मातरम संदर्भातील वादाच्या पार्श्वभूमीवर बोलताना आझमी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, देशाच्या संसदीय आणि विधानसभेच्या प्रक्रियेत वंदे मातरम वाजवले जाते, तेव्हा मुस्लिम समाज नेहमीच आदराने उभा राहतो आणि अनेक मुस्लिम हे गीत गातातही. मात्र, कोणालाही त्यांच्या धार्मिक श्रद्धेच्या पलीकडे जाऊन काही करण्यास भाग पाडणे योग्य नसल्याची भूमिका त्यांनी मांडली. श्रद्धेचा सन्मान राखणे हीच लोकशाहीची खरी ओळख असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले.

अबू आझमी यांनी इस्लाम धर्मातील मूलभूत तत्त्वांवरही प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, इस्लाममध्ये अल्लाहशिवाय इतर कोणालाही दैवी स्वरूपात मानणे हे अत्यंत गंभीर पाप मानले जाते. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने किंवा प्रतीकासमोर धार्मिक भावनेने नतमस्तक होणे, हे इस्लामच्या शिकवणीला धरून नाही. याचा अर्थ देशाचा किंवा राष्ट्रगीताचा अपमान असा होत नसून, हा केवळ श्रद्धेचा प्रश्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आम्ही अल्लाहशिवाय इतर कोणासमोरही डोके टेकवू शकत नाही, हा आमचा धार्मिक विश्वास आहे, असे सांगत त्यांनी या विषयाला भावनिक नव्हे तर तात्त्विक चौकट दिली.

## पुढील दोन-तीन महिन्यात पाकिस्तानशी युद्ध होईल

### प्रकाश आंबेडकरांचा मोठा दावा



■ मुंबई : "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विश्वगुरू' बनण्याच्या नादात भारताने जागतिक पातळीवर एकही मित्र ठेवलेला नाही. 'ऑपरेशन सिंदूर'च्या चार दिवसांच्या युद्धावेळी एकही देश भारताच्या पाठीशी उभा राहिला नाही. आता येत्या दोन-तीन महिन्यांत पुन्हा युद्ध होण्याची शक्यता आहे, आणि हे युद्ध पाकिस्तानसोबत होईल. मात्र, चिंतेची बाब म्हणजे मोदींच्या धोरणांमुळे अमेरिका, रशिया, चीन आणि इंग्लंड हे सर्व देश आज पाकिस्तानला शस्त्रपुरवठा करत आहेत. त्यामुळे एकाच वेळी आपण चार जणांशी लढणार आहोत, हे लक्षात ठेवा," असा गंभीर इशारा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी दिला आहे.

उल्हासनगर येथे वंचित बहुजन आघाडीची सभा पार पडली. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदींच्या परराष्ट्र धोरनाचे वाभाडे काढताना आंबेडकर म्हणाले, "आज मोदी डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी भांडत आहेत, म्हणून ट्रम्प पाकिस्तानला सहारा देत आहेत. पुतीन भारतात येऊन गेले, पण त्याआधीच त्यांनी पाकिस्तानला शस्त्र देण्याचे कबूल केले आहे. इंग्लंड पाकिस्तानला हत्यार देतोय, तर चीन आधीच शस्त्र घेऊन बसला आहे. हे देश भारताच्या किंवा भारतीय जनतेच्या विरोधात नाहीत, तर मोदींच्या अहंकाराविरोधात आहेत. मोदींना धडा शिकवताना भारतीय जनतेला त्याची झळ सोसावी लागत आहे."

रिलायन्स कनेक्शन अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ (कर) का लावला, याचे विश्लेषण करताना आंबेडकरांनी रशियाच्या तेल व्यापारातील 'रिलायन्स' कनेक्शन उघड केले. ते म्हणाले, "एक ऐतिहासिक सत्य आहे. जेवढी जास्त लोक, तेवढी मोठी बाजारपेठ. जेवढी कमी लोक, तेवढी बाजारपेठ कमी, अशी असणारी परिस्थिती आहे. डोनाल्ड ट्रम्प हेच म्हणतोय की, भारतातील ४७ टक्के लोक दारिद्र रेषेखाली आहेत. रशियाचे तेल विकून वर्षभराला ४० कोटींचा होणारा नफा, हा कुणाला जातो? भारताच्या तिजोरीत जातोय की, रिलायन्सच्या तिजोरीत जातोय? तो भारताच्या तिजोरीत जात नसेल, तर आम्ही तुमच्याशी भांडण केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आम्ही तुमच्यावर ५० टक्के टॅक्स लावला." "रशियाचे तेल विकून होणारा नफा भारताच्या तिजोरीत जात नसून, तो रिलायन्स कंपनीच्या तिजोरीत जात आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

## भाजप सरकारकडून जनतेची फसवणूक



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी भाजप सरकारवर सडकून टीका केली आहे. केंद्र व राज्यात एकाच विचाराचे सरकार आहे. पण त्यानंतरही भाजप सरकारकडून जनतेची घोर फसवणूक केली जात आहे, असे ते म्हणालेत.

आज दुपारी घेतलेल्या एका पत्रकार परिषदेत आदित्य ठाकरे यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. या प्रकरणी त्यांनी भाजपने निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने पूर्ण न झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, भाजपने लाडक्या बहिणींना दरमहा 2100 रुपये देण्याची घोषणा केली होती. पण अजूनही लाडक्या बहिणींच्या खात्यात 2100 रुपयांचा हप्ता जमा झाला नाही.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या आहेत. पण भाजपने दिलेले कर्जमुक्तीचे आश्वासन अद्याप पूर्ण झाले नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी तर नाहीच, पण सरकारने जाहीर केलेली मदतही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही. केंद्रात व राज्यात भाजचे सरकार आहे. पण तरीही सरकार खोट्या घोषणा करत आहे. भाजपच्या सर्वच घोषणा फसव्या आहेत, असे ते म्हणाले.

आदित्य ठाकरे यांनी यावेळी पगडी, सेस असलेल्या मालमत्तेच्या बाबतीतही जनतेची फसवणूक केल्याचा आरोप केला. सरकारने पगडी, सेस असलेल्या मालमत्तांवरही जनतेची फसवणूक केली. सरकारने सर्व भाडेकरूंना 'भोगवटादार' दर्जा द्यावा आणि घरमालकांकडून होणाऱ्या निष्कासनाविरुद्ध कायदेशीर संरक्षण द्यावे. 'सक्षम प्राधिकरणा'चा कायदेशीर प्रश्न न्यायालयात सोडवावा, असे ते म्हणाले.

या प्रकरणी त्यांनी सरकारवर पगडी सेस मालमत्तांमधील भाडेकरूंऐवजी घरमालक व बिल्डर्सची बाजू घेतल्याचा आरोप केला. सरकारच्या निर्णयामुळे भाडेकरूंना फक्त तेवढीच जागा मिळेल, जेवढी त्यांच्याकडे आधीपासून आहे. याऊलट घरमालक/बिल्डर्सना अतिरिक्त एफएसआय, टीडीआर आणि इतर सवलती मिळतील, असे ते म्हणाले. आम्ही भाडेकरूंच्या हक्कांसाठी त्यांच्यासोबत उभे आहोत. त्यांचे संरक्षण कोणत्याही परिस्थितीत झालेच पाहिजे, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

सध्या केंद्रीय निवडणूक कार्यालयात कोणतीही अंतिम मतदार यादी उपलब्ध नाही. वेबसाइटवरही काहीही अपलोड केलेले नाही. त्यांचे लाखो घोटाळे आणि चुका उघडकीस आणल्यानंतरही, अंतिम मतदार यादी मशीनद्वारे वाचण्यायोग्य नसेल. अशा फसवणुकीबद्दल बीएमसीमधील अधिकाऱ्यावर देशविरोधी कारवायांचे आरोप का लावू नयेत? असेही ते म्हणाले.

## राम मंदिर आंदोलनाशी संबंधित डॉ. रामविलास वेदांतींचे निधन



■ वृत्तसंस्था, अयोध्या, दि. १५ :
राम मंदिर आंदोलनातील अग्रणी संत, माजी खासदार डॉ. रामविलास दास वेदांती यांचे सोमवारी सकाळी निधन झाले. ते 67 वर्षांचे होते. मध्य प्रदेशातील रीवा येथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. डॉ. वेदांती 7 डिसेंबर रोजी अयोध्या-दिल्ली येथे गेले होते. तेथे त्यांनी विहिपच्या केंद्रीय मार्गदर्शक मंडळाच्या बैठकीत भाग घेतला.

10 डिसेंबर रोजी ते दिल्लीहून रीवा येथे पोहोचले. तेथे त्यांची रामकथा सुरू होती. याच दरम्यान त्यांची तब्येत बिघडली. दोन दिवसांपासून ते रीवा येथील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल होते. रविवारी मध्य प्रदेशचे उपमुख्यमंत्री राजेंद्र शुक्ल त्यांना एअरलिफ्ट करून भोपाळ एम्समध्ये नेणार होते. परंतु, खराब हवामानामुळे एअर ॲम्ब्युलन्सला उतरण्याची परवानगी मिळाली नाही. यामुळे त्यांना एअरलिफ्ट करून एम्समध्ये दाखल करता आले नाही. दुपारी 12:20 वाजता त्यांचे निधन झाले. त्यांचे उत्तराधिकारी महंत राघवेश दास वेदांती यांनी ही माहिती दिली.

रामविलास वेदांती हे हनुमानगढीचे महंत अभिराम दास यांचे शिष्य होते. ते अयोध्येतील हिंदू धाम नया घाट येथे राहत होते. त्यांचे वशिष्ठ भवन नावाचे एक आश्रमही आहे. रामलला आणि हनुमानगढीसमोर त्यांनी अनेक दशके रामकथा सांगितली. ते संस्कृतचे विशेष विद्वान मानले जात होते. ते रामजन्मभूमी न्यासाचे सदस्य होते. यासोबतच ते भाजपच्या तिकिटावर खासदारही झाले. मुख्यमंत्री योगी यांनी वर श्रद्धांजली वाहिली.

डॉ. वेदांती यांचा जन्म 7 ऑक्टोबर 1958 रोजी रीवा जिल्ह्यातील गुढवा गावात झाला होता. ते दोन वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले होते. ते माजी केंद्रीय मंत्री अर्जुन सिंह यांचे गुरु होते. वेदांती 12 वर्षांच्या वयात अयोध्येत आले होते. डॉ. वेदांती 12व्या लोकसभेत उत्तर प्रदेशातील प्रतापगडमधून भाजपचे खासदार म्हणून निवडून आले होते.

## मुंबईकरांना मिळणार न्यूयॉर्कसारखे सेंट्रल पार्क

### महालक्ष्मी रेसकोर्सच्या जागेवर जागतिक दर्जाचा प्रकल्प : एकनाथ शिंदेंची मोठी घोषणा



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्सचा चेहरामोहरा आता पूर्णपणे बदलणार आहे. रेसकोर्सच्या ताब्यातील 120 एकर जागेवर मुंबई महापालिकेतर्फे भव्य 'सेंट्रल पार्क' उभारण्यात येणार आहे. थेट अमेरिकेतील 'न्यू यॉर्क सेंट्रल पार्क'च्या धर्तीवर हा प्रकल्प साकारला जाणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे सादरीकरण आज मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात पार पडले. या संपूर्ण प्रकल्पाचे डिझाइन सुप्रसिद्ध आर्किटेक्ट हाफीज कॉन्ट्रॅक्टर यांनी केले असून, एकनाथ शिंदे यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले. शिंदे म्हणाले, "2022 मध्ये महायुतीचे सरकार आल्यानंतर आम्ही ही संकल्पना मांडली होती. आता तिला मूर्त स्वरूप दिले जात आहे. हे पार्क जागतिक दर्जाचे असेल."

या पार्कमध्ये मुंबईकरांना मनोरंजनासोबतच क्रीडा सुविधांची मोठी मेजवानी मिळणार आहे. यात प्रामुख्याने टॉपरी गार्डन, बॉटनिकल गार्डन, सिटी फॉरेस्ट, स्नो पार्क, अम्युझमेंट पार्क, भव्य कन्व्हेन्शन सेंटर असणार आहे, शिवाय, या सेंट्रल पार्कच्या खाली जमिनीखाली तब्बल 10 लाख स्क्वेअर फुटांचे भव्य स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारण्यात येणार आहे. यात कबड्डी, खो-खो या आपल्या मातीतल्या खेळांपासून ते स्केटिंग रिंग, ज्युदो, कराटे आणि बॅडमिंटन कोर्ट सारख्या जागतिक स्तरावरील सर्व खेळांच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत

जुलै 2024 मध्ये रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबने रेसकोर्सची जमीन मुंबई महापालिकेला हस्तांतरित करण्याचा करार केला होता. त्यानुसार 120 एकर जागा पालिकेला मिळाली आहे, ज्यावर हे पार्क उभारले जाईल.

## तेजस्वी घोसाळकरांचा अखेर भाजप प्रवेश




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
शिवसेना ठाकरे गटाशी एकनिष्ठ असलेल्या उत्तर मुंबईतील घोसाळकर घरात आज अधिकृतपणे राजकीय फूट पडली. दिवंगत नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नी तेजस्वी घोसाळकर यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला.

आपल्या पोटच्या मुलाच्या निधनानंतर सूनबाईंनी विरोधी पक्षात प्रवेश केल्याने ज्येष्ठ शिवसैनिक आणि माजी आमदार विनोद घोसाळकर यांना अश्रू अनावर झाले. "अभिषेक असता तर हा प्रश्नच उद्भवला नसता. मुलाचे आपण हक्काने कान धरू शकतो, पण सूनबाईंचे कान कसे धरणार?" अशा शब्दांत त्यांनी आपली हतबलता व्यक्त केली.

माझ्या प्रभागात विकासाची कामे करण्यासाठी मी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली माझी सगळी कामे होतील, अशी मी अपेक्षा करते, असे तेजस्वी घोसाळकर पक्षप्रवेशानंतर म्हणाल्या.

या पक्षप्रवेशावर प्रतिक्रिया देताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि माजी आमदार तेजस्वी घोसाळकर यांचे सासरे विनोद घोसाळकर यांना अश्रू अनावर झाले.

# कांदिवलीत गुंडांचा पोलिसांवर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
गुन्हेगारांना ताब्यात घेण्यासाठी गेलेल्या एका पोलिस पथकावर गुंडांनी हल्ला केल्याची घटना मुंबईच्या मुंबईच्या कांदिवली (पश्चिम) परिसरात घडली आहे. पोलिसांनी या प्रकरणी काही गुंडांना ताब्यात घेतले असून, त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

कांदिवली येथे रविवारी रात्री उशिरा ही घटना घडली आहे. कांदिवली पश्चिम येथील एकता नगरात 2 गटांमध्ये हाणामारी सुरू होती. पोलिसांना त्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांचे एका पथकाने घटनास्थळाच्या दिशेने धाव घेतली. ते एकता नगरमध्ये पोहोचले. यावेळी त्यांनी दोन्ही गटातील काही गुंडांना आपल्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला.

त्यावेळी काही गुंडांनी अचानक पोलिसांवरच उलट हल्ला केला. त्यांनी पोलिस कर्मचाऱ्यांनी कॉलर पकडून त्यांना कारवाई करण्यापासून रोखले. काही गुंडांनी कर्मचाऱ्यांना मारहाणही केली.

हे गुंड पोलिसांच्या अंगावर धावून जात असताना तिथे अनेकजण उपस्थित होते. त्यापैकी काहींनी हा प्रकार आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला. त्यानंतर या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला. पोलिसांनी खबरदारी म्हणून घटनास्थळी आणखी बंदोबस्त वाढवला आहे. एकता नगर व लगतच्या परिसरात गस्त वाढवली आहे. काही व्हिडिओत पोलिस आरोपींना पकडण्यासाठी जात असताना गुंड त्यांना त्यांना पकडत असल्याचेही दिसत आहे.

## शिष्यवृत्ती कुणाची कृपा किंवा भीक नाही

### रामदास आठवले अजित पवारांवर संतापले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या टीआरटीआय, बार्टी, सारथीतर्फे दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीवर मर्यादा घालण्याच्या विधानाचा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी खरपूस समाचार घेतला आहे.



शिष्यवृत्ती कुणाची कृपा, दान किंवा भीक नाही. ती वंचित, कष्टकरी व गुणवंत विद्यार्थ्यांचा घटनात्मक अधिकार आहे, असे ते म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे या प्रकरणाचा वाद अधिकच चिघळण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांनी हिवाळी अधिवेशनात विधानसभेत बोलताना काही कुटुंबातील 4-5 जण दरमहा प्रत्येकी 42 हजार रुपयांची फेलोशिप घेतल्याचा दावा करत पीएचडी प्रवेशावर मयार्दा घालण्याचे विधान केले होते. त्यावरून आता राज्याच्या राजकारणात संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर रामदास आठवले यांनी अजित पवारांच्या विधानावर आश्चर्य व्यक्त करत त्यांच्यावर उपरोक्त शब्दांत टीका केली आहे.

रामदास आठवले म्हणाले, अजित पवार हे माझे मित्र आहेत आणि ते फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांशी निष्ठावान नेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांनी केलेले हे वक्तव्य आश्चर्यकारक आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात स्पष्टपणे लिहून ठेवले आहे की शिक्षण हा प्रत्येक माणसाचा मुलभूत अधिकार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती ही कोणाची कृपा, दान किंवा भीक नाही; ती वंचित, कष्टकरी आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा घटनात्मक अधिकार आहे.

जर एकाच कुटुंबातील पाच विद्यार्थी पीएचडीपर्यंत पोहोचत असतील, तर त्यावर शंका घेण्याऐवजी समाजाने आणि शासनाने अभिमान व्यक्त केला पाहिजे. ही परिस्थिती म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रत्यक्षात उतरलेला विजय आहे. आत्मसन्मान, समता आणि संविधानाने दिलेला हक्क जपण्यासाठी आहे.

**विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर हात टाकू नका**

आठवले पुढे म्हणाले, कोणतेही शिक्षण कमी-जास्त नसते. प्रत्येक विषय, प्रत्येक अभ्यासक्रम आणि प्रत्येक ज्ञानशाखा समाजासाठी तितकीच महत्त्वाची असते. कोणता अभ्यास उपयुक्त आणि कोणता अनावश्यक हे ठरवण्याचा अधिकार कोणालाही नाही.

आज वंचित समाजातील विद्यार्थी पीएचडी, संशोधन आणि परदेशी शिक्षणापर्यंत पोहोचत आहेत हेच खरे सामाजिक परिवर्तनाचे जिवंत उदाहरण आहे. गैरप्रकार असतील तर कारवाई करा; पण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर हात टाकू नका! विद्यार्थ्यांशी चर्चा न करता घेतलेला कोणताही निर्णय आम्ही मान्य करणार नाही, असेही आठवले या प्रकरणी म्हणाले.

अजित पवार विधानसभेत बोलताना म्हणाले होते, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल-वंचित घटकांतील, परदेशात शिक्षण घेण्याची क्षमता नसलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्राधान्याने मदत करण्याचा सरकारचा उद्देश आहे.

त्यानुसार, सरकारतर्फे टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत यासारख्या स्वायत्त संस्थांच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. पण काही ठिकाणी एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सध्या या शिष्यवृत्तीसाठी या संस्थांचा निम्म्यापेक्षा अधिक निधी खर्च होत आहे. त्यामुळे इतर गरजू विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांसाठी निधी उपलब्धतेवर परिणाम होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत.

# वानखेडेवर दुमदुमला सचिन, सचिनचा जयघोष

## मेस्सी आणि तेंडुलकरच्या भेटीने उत्साह द्विगुणित मुख्यमंत्री फडणवीसांनीही व्यक्त केले मनोगत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१५ :
अर्जेंटीनाचा दिग्गज फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी भारतात 3 दिवसांच्या 'जीओएटी इंडिया' दौऱ्यावर आहे. फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या हस्ते महाराष्ट्र सरकारच्या प्रोजेक्ट महादेवाचे उद्घाटन करण्यात आले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, टायगर श्रॉफ, आर. अश्विन आणि फुटबॉलपटू सुनील छेत्री उपस्थित होते.

यावेळी प्रोजेक्ट महदेवाचे उद्घाटन मेस्सी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच अनेक वर्षांनी पुन्हा एकदा वानखेडे स्टेडियममध्ये सचिन.. सचिन.. सचिन आवाज पुन्हा एकदा दुमदुमला.

मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकर देखील यावेळी उपस्थित होते. सचिन तेंडुलकरने यावेळी मेस्सीसोबत हस्तांदोलन करत त्यांची जर्सी मेस्सीला भेट दिली. हा क्षण अनेक क्रिकेट चाहते आणि फुटबॉल चाहत्यांनी आपल्या डोळ्यात तसेच कॅमेऱ्यात कैद केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना 'गणपती बाप्पा मोरया'ने आपल्या प्रतिक्रियेला सुरुवात केली.

ते म्हणाले, महान खेळाडू मेस्सीचे स्वागत करताना मला खूप आनंद होत आहे आणि ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे की तो आमच्या 60 मुलांना मार्गदर्शन करत आहे, जे 2024 मध्ये फुटबॉलच्या मैदानात आपले वर्चस्व गाजवणार आहेत.

'प्रोजेक्ट महादेवा'चा उद्देश आपल्या राज्यात फुटबॉलला पुन्हा एकदा केंद्रस्थानी आणणे हा आहे आणि आमच्या 60 मुलांना मार्गदर्शन केल्याबद्दल मेस्सी, तुमचे खूप खूप आभार. तुम्ही त्यांना प्रेरणा दिली आहे आणि मी तुम्हाला खात्री देतो की, त्यापैकी एक खेळाडू तुम्हाला फिफा विश्वचषकात खेळताना दिसेल.



# मिशन एक्सीलेन्स उपक्रम विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार : जिल्हाधिकारी वर्षा मीना



**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**
विद्यार्थांना गुणवत्तापूर्ण अध्ययनाच्या माध्यमातून शैक्षणिक आमूलाग्र बदल घडवण्यासाठी ढरीसशीं झएअघ (टार्गेट पीक) हे शैक्षणिक ॲप विकसित करण्यात आले असून जिल्हा वार्षिक योजना नावीन्यपूर्ण योजनेच्या माध्यमातून मिशन एक्सीलेन्स उपक्रम जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता चौथी, पाचवी, सातवी आणि आठवी मधील २० हजार विद्यार्थ्यांसाठी महत्वाची भूमिका बजावणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज इथे केले.नियोजन भवन येथे जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक,विस्तार शिक्षण अधिकारी यांची शैक्षणिक ॲप संदर्भात कार्यशाळा घेण्यात आली यावेळी त्या बोलत होत्या.जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर,शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार उपशिक्षणाधिकारी श्री.प्रधान, मुख्यमंत्री कार्यालय फेलो भारसकर आदी उपस्थित होते.या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्हिडिओच्या माध्यमातून शिक्षण,प्रश्नोत्तरे आणि उत्तरे, विशेष व्याख्याने ह्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसाठी प्रयत्न केले जाणार असून शिष्यवृत्ती,नवोदय, एनएमएमएस यासह महत्त्वपूर्ण परीक्षांमध्ये अकोला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा टक्का वाढावा तसेच विद्यार्थ्यांना एका क्लिकवर शिष्यवृत्ती परीक्षेबाबत अध्ययन करता यावे या उद्देशाने सर्व शाळांमध्ये या शैक्षणिक ॲपचा वापर करावा तसेच शैक्षणिक गुणवत्तेबाबत वेळोवेळी तपासणी करावी असे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले.

## हिवरा कोरडे फाट्यावरून ६९ हजारांचा गुटखा जप्त

**मुर्तिजापुर :** तालुक्यातील माना पोलिसांनी प्रतिबंधित गुटख्याच्या वाहतुकीवर मोठी कारवाई केली आहे.या विशेष मोहिमेदरम्यान एका आरोपीला अटक करूनत्याच्याकडून ६९,४७८/- रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. हिवरा कोरडे फाट्यावर नाकाबंदी मोटारसायकलवरून दरम्यान प्रतिबंधित गुटखा घेऊन जाणारा आरोपी ईरशाद खान अयुब खान ( वय ३४, रा. वाठोडा शुक्लेश्वर, भातकुली, अमरावती) याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले.. पानमसाला व सुगंधीत तंबाखू: ९,४७८/- रुपये, वाहतुकीसाठी वापरलेली मोटारसायकल अंदाजे ६० हजार रुपयांची अशी एकूण किंमत: ६९,४७८ /- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीला अटक केली असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार, पोलीस उपनिरीक्षक गणेश महाजन, मनीष तिवारी आणि उमेश हरमकर यांनी सक्रिय सहभाग घेतला.

# व्यापार व उद्योगाच्या नवीन प्लॅटफॉर्मसाठी विदर्भ चेंबरची विटेक्स २०२६ प्रदर्शनी




**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**
विदर्भ चेम्बर ऑफ कॉमर्स एन्ड इंडस्ट्री, अकोला द्वारा आयोजित व मुख्य प्रायोजक मार्वल ट्रिनीटी रियल एस्टेट एलएलपी व सह प्रायोजक विठ्ठल ऑईल असणारी विटेक्स प्रदर्शनी २०२६ चे भव्य आयोजन दि २, ३, ४ व ५ जानेवारी २०२६ रोजी गोरक्षण रोड येथील गोरक्षण संस्थान ग्राउंडवर होत आहे.

या विशाल प्रदर्शनीत १८० पेक्षा जास्त स्टॉल्स राहणार असून या माध्यमातून परिसरातील लहान मोठे उद्योग, व्यापारी, सेवा प्रदाता व स्टार्ट-अप्स द्वारे आपले सर्वश्रेष्ठ उत्पादने व सेवांचे प्रदर्शन व विक्री करणार असून सर्व अकोलकर नागरिकांसाठी स १० ते रात्री १० पर्यंत प्रवेश मोफत असणारी ही प्रदर्शनी व्यापारी, उद्योजक व नागरिकासाठी मोठी पर्वणी ठरणार असल्याची माहिती विदर्भ चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी दिली.सोमवारी चेंबरच्या कार्यालयात संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत या व्यापार उद्योग प्रदर्शनीची माहिती देण्यात आली.यावेळी मंचावर चेंबरचे सचिव निरव वोरा,वरीष्ठ उपाध्यक्ष सिद्धार्थ रुहाटीया,कनिष्ठ उपाध्यक्ष निखिल अग्रवाल, कोषाध्यक्ष किशोर बाछुका, सहसचिव किरीट मंत्री,सहसंयोजक राहुल मित्तल आदी उपस्थित होते.विटेक्स २०२६चा मुख्य उद्देश्य पश्चिम विदर्भात व्यापार, उद्योग व उद्यमिताला गति मिळावी, स्वदेशी, मेक इन इंडिया व वोकल फॉर लोकलच्या ग्लोबल भावना ला पुढे नेणे,रोजगाराचे नवे दालन उघडणे तथा अकोला जिल्ह्यास एक वाढते प्रमुख व्यापारिक हबच्या रुपात स्थापित करने आहे.हे आयोजन क्षेत्रीय एमएसएमई, स्टार्ट-अप्स, एग्रो-प्रोसेसिंग यूनिट्स व स्थानीय उत्पादनास व्यापक बाजार प्रदान करण्यासाठी एक प्रभावी माध्यम निर्माण करणे होय.

या प्रदर्शनीत १८० पेक्षा अधिक आकर्षक स्टॉल्स राहणार असून पश्चिम विदर्भातील उद्योग-व्यापाराची आतापर्यंतचे सर्वात मोठे आयोजन हे राहणार असून यात एकाच छतात सर्व प्रकारचे उत्पादन व सेवा राहणार आहेत. सर्व कुटुंबातील सदस्यांना याचा लाभ घेता येईल असे हे आयोजन असून यात विभिन्न स्वादाने भरपूर विशेष फूड ज़ोन राहणार असून मोफत प्रवेश व मोफत विशाल पार्किंग राहणार आहे.या प्रदर्शनीत

सोलर पैनल्स व फिटिंग्स, फर्नीचर,गृहपयोगी साहित्य, होम डेकोर व इंटीरियर डिज़ाइनिंग, गिफ्ट आर्टिकल्स, डिजाइनर कपड़े,ऑटोमो बाइल्स, स्पोर्ट्स व फिटनेस, रोबोटिक्स, वेलनेस सेक्टर, वॉटर ट्रीटमेंट सॉल्यूशन, एग्रो प्रोसेसिंग यूनिट्स साठी मशीनरी व साहित्य, डेयरी प्रोडक्ट्स, प्री-फैब्रिकेटेड स्ट्रक्चर,बैंकिंग, फाइनेंस सेवा, करियर गाइडेंस,गृह निर्माण, अकाउंटिंग सॉफ्टवेयर समवेत व्यापारी व नित्य उपयोगी पडणारे सर्व उत्पादने व सेवा राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## जिल्हा महिला व बालविकास कार्यालय अतंर्गत बाल विवाह मुक्त भारत



**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**
जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अकोला अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष व मिशन शक्ती सखी वन स्टॉप सेंटर अकोला च्या वतीने बाल विवाह मुक्त भारत १०० दिवस संकल्प अभियान आणि महिला हिंसा निर्मूलन निमित्ताने दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी स्कूल ऑफ स्कॉलर, बिरला कॉलनी, अकोला येथे जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला प्रमुख मार्गदर्शक श्रीमती प्रांजली जैस्वाल सदस्य बालकल्याण समिती अकोला, ॲड. मनिषा भोरे केंद्र प्रशासक आणि कु.प्रिया इंगळे आदि उपस्थित होते.

## शासनाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या सह अध्यक्षपदी आमदार रणधीर सावरकरांची केली नियुक्ती

**■अकोला,दि १४ (प्रतिनिधी) :**
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-१ च्या यशस्वीतेनंतर शासनाने सदर प्रकल्पाचा टप्पा -२ राबविण्याचा निर्णय घेतला, शेती आणि शेतकऱ्यांसोबत असलेली नाळ, कृषि क्षेत्रातील धोरण, योजना आणि जमिनीवरील वास्तव याची जाण असलेल्या आमदार रणधीर सावरकरांची मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या सह अध्यक्षपदी नियुक्ती केली तसेच रणधीर सावरकरांच्या नियुक्तीस उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे , उपमुख्यमंत्री अजित दादा पवार , कृषी मंत्री दत्तात्रय भरणे , राज्य मंत्री आशिषजी जयस्वाल यांनी मान्यता दिली. राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी दि. १४ आक्टोंबर २०२४च्या शासन निर्णयानुसार गठित करण्यात आलेल्या समितीच्या रचनेत सुधारणा करून सह अध्यक्ष पद निर्माण करून आमदार रणधीर सावरकर यांना सहअध्यक्ष नेमण्यात येऊन नव्याने समिती गठीत करण्यात आलेली आहे, या संबंधाने महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग यांनी दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी शासन निर्णय क्र. कृवपदुम१९०४६/४४/२०२५/MAG- ८अ (ए-१२६२२८५) अन्वये आदेश निर्गमित केला.

### ऐतिहासिक सातारा नगरीतील ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात

# ज्येष्ठ साहित्यिक देवानंद गहिले यांच्या कवितेची निवड

**■पातुर,दि १४ (प्रतिनिधी) :**
पातूर येथील ज्येष्ठ साहित्यिक, कवी कलावंत देवानंद गहिले यांच्या अत्यंत लोकप्रिय कवितेची निवड ऐतिहासिक सातारा शहरात होत असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील 'कवी कट्टा' या प्रतिष्ठित व्यासपीठावर सादरीकरणासाठी झाली आहे.गहिले यांच्या ङ्गपुस्तके निकामी नाहीङ्ग या चर्चित कवितेला यापूर्वी अखिल भारतीय शब्दवेल साहित्य संमेलन - शेगाव तसेच मराठी साहित्य संमेलन - यवतमाळ येथे प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. या कवितेने सर्वत्र लोकप्रियता मिळवल्यानंतर आता तिला अखिल भारतीय स्तरावरील या सर्वोच्च समरंभात स्थान मिळाले आहे.४ जानेवारीला कवितेचे सादरीकरणअखिल



भारतीय मराठी साहित्य संमेलनातील कवी कट्ट्याचे प्रमुख राजन लाखे आणि मुख्य समन्वयक सविता कारंजकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, गहिले यांची कविता ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत सादर करण्यात येणार आहे.गहिले यांच्या साहित्यिक वाटचालीला मिळाला मोठा मानगेल्या अनेक वर्षांपासून देवानंद गहिले साहित्य क्षेत्रात सक्रिय असून कथा, कविता, लेख, कादंबरी, चारोळी, गीत इत्यादी विविध साहित्यप्रकारांमध्ये त्यांनी प्रभावी लेखन केले आहे. हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये त्यांच्या लेखनाला मोठी लोकप्रियता लाभली आहे. ग्रामीण भागातील वास्तव, सामाजिक प्रश्न, मानवी भावना आणि कलात्मक अभिव्यक्ती या सर्वांचा सुंदर संगम त्यांच्या लेखणीतून पाहायला मिळतो.त्यांच्या साहित्यसेवेबद्दल त्यांना यापूर्वी अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. सातत्यपूर्ण लेखन, प्रभावी शैली आणि जनमानसाला भिडणाऱ्या विषयांमुळे ते ग्रामीण साहित्यविश्वातील एक प्रख्यात नाव बनले आहेत.जिल्ह्यात आनंदाचे वातावरणगहिले यांच्या कवितेची निवड झाल्याने अकोला जिल्ह्यात तसेच साहित्यप्रेमी व कलावंतांमध्ये आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला**
मुर्तिजापूर रोड, अकोला - 444001
वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in
ई-मेल : eemjpda@rediffmail.com

जा.क्र. / निविदा / ३१४३/२०२५
दिनांक : १५/१२/२०२५

**-- निविदा सुचना --**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडुन खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | निविदा सुचना क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | क्रमांक ५७ सन २०२५-२६ | जल जीवन मिशन अंतर्गत अकोट ८४ गावे प्रादे. पा.पु. योजना - जलशुध्दीकरण केंद्र अकोट येथे विद्युत पुरवठा, ईलेक्ट्रीक केबल्स व अनुषंगीक कामे. | रु. ८,४२,७२४/- |
| २ | क्रमांक ५८ सन २०२५-२६ | जल जीवन मिशन अंतर्गत लंघापूर ५० गावे प्रादे. पा.पु. योजना - हेडवर्क्स व जलशुध्दीकरण केंद्र, खांदला, उमा धरण येथे विद्युत पुरवठा, ईलेक्ट्रीक केबल्स व अनुषंगीक कामे. | रु. ८,३४,७३३/- |
| ३ | क्रमांक ५९ सन २०२५-२६ | जल जीवन मिशन अंतर्गत लाखपुरी १८ गावे प्रादे. पा.पु. योजना - जलशुध्दीकरण केंद्र, मंगरुळकांबे येथे विद्युत पुरवठा, ईलेक्ट्रीक केबल्स व अनुषंगीक कामे. | रु. ८,४१,१५८/- |

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडुन दि. १६/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर निविदेचा विक्री कालावधी दि. १६/१२/२५ ते २३/१२/२५ असा असुन निविदा भरुन सादर करण्याचा दि. २४/१२/२५ दु. ३.०० वाजेपर्यंतचा आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. १६.१२.२०२५ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास निशुल्क उपलब्ध आहेत.

कार्यकारी अभियंता
म.जी.प्रा. विभाग, अकोला.


## मनपा प्रशासनाव्दारा

( पान ३ वरुन)

मर्तीजापुर यांची सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.१ म्हणून श्री पी.झेड.भोसले तहसीलदार, नझूल, जि.अकोला तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.२ म्हणून श्री वि.सा.चौधरी, उपअभियंता, का.अ.यांत्रिकी विभाग, अकोला आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.३ म्हणून श्री गजानन घोंगे, प्र.सहा.आयुक्त क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम विभाग, मनपा अकोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.प्रभाग क्रं. ११-बाजारपेठ, प्रभाग क्रं. १२-सिव्हील लाईन, प्रभाग क्रं. १८-वाशिम रोड करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री संतोष येवलीकर, उपविभागीय अधिकारी, बाळापुर यांची सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.१ म्हणून श्री राजेंद्र पाटील, तहसीलदार, मानोरा, जि.वाशिम तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.२ म्हणून श्री प्र.ब.जाधव, उप कार्यकारी अभियंता, का.अ.यांत्रिकी विभाग, अकोला आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.३ म्हणून श्री पंकज जोगळेकर सहा.कर अधिक्षक क्षेत्रीय कार्यालय उत्तर झोन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.प्रभाग क्रं. १३-पीकेव्ही, प्रभाग क्रं. १४-मलकापूर, प्रभाग क्रं. १५-गौरक्षण रोड करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री विजय पाटील, उप जिल्हाधिकारी, रो.ह.यो.अकोला यांची सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.१ म्हणून श्री श्याम धनमणे, अधिक्षक, जि.का.अकोला तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.२ म्हणून श्रीमती स्वप्नाली डलगे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृदा व जलसंधारण उपविभाग, अकोला आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.३ म्हणून श्री राजेश सरप प्र.सहा. आयुक्त क्षेत्रीय कार्यालय पुर्व झोन क्षेत्रीय कार्यालय, मनपा, अकोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रभाग क्रं. १६-सिंधी कॅम्प, प्रभाग क्रं. १९-कौलखेड, प्रभाग क्रं. २०-खडकी करिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री निखिल खेमनार, उपजिल्हाधिकारी, महसूल, अकोला यांची तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.१ म्हणून श्रीमती प्रज्ञा काकडे तहसीलदार शेगांव, जि.बुलढाणा, तसेच सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.२ म्हणून श्री उज्वल पटेल सहा.अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, अकोला आणि सहा.निवडणूक निर्णय अधिकारी क्रं.३ म्हणून श्री देविदास निकाळजे प्र.सहा.आयुक्त क्षेत्रीय कार्यालय दक्षिण झोन क्षेत्रीय कार्यालय, मनपा, अकोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.


महाराष्ट्र शासन
**मृद व जलसंधारण विभाग**
अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, नागपूर
प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अमरावती
जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अकोला
पत्ता - नेहरु पार्क चौक, मर्तिजापूर रोड, प्रकाश टि.व्हि.एस.शोरुम समोर, अकोला ४४४ ००१
ई-मेल पत्ता - eemilsdnakola@rediffmail.com दुरध्वनी / फॅक्स क्रमांक — ०७२४ २४१५५६०

**ई-निविदा सुचना क्र.ब-१/ १८ /सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अकोला, महाराष्ट्र शासन चे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-1 नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोडींगकरीता दि.१६/१२/२०२५ (११:०० वा.) पासून उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी वरील संकेतस्थळाला भेट द्यावी. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अकोला यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थाळावर कळवण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किमत (रुपये) |
|---|---|---|
| १ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.खरब ढोरे** ता.मुर्तिजापूर जि.अकोला येथील कोल्हापुरी पध्दत बंधारा **क्र.२ चे** बांधकाम करणे | २,१०,२९,३२२/- |
| २ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.किनखेड** ता.मुर्तिजापूर जि.अकोला येथील कोल्हापुरी पध्दत बंधारा **क्र.२ चे** बांधकाम करणे | १,६६,७३,९११/- |
| ३ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.सावरखेड** ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथील कोल्हापुरी पध्दत बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | १,४४,२१,९०४/- |
| ४ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.धाकली** ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथील व्दारयुक्त सिमेंट बंधारा **क्र.१** चे बांधकाम करणे | ४६,५९,२६९/- |
| ५ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.फनी** ता.मुर्तिजापर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधाऱ्याचे बांधकाम करणे | २४,०४,३४९/- |
| ६ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.किन्ही** ता.मुर्तिजापर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधाऱ्याचे बांधकाम करणे | २३,८४,५१६/- |
| ७ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.घोटा** ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधारा **क्र.६** चे बांधकाम करणे | २१,४८,६७३/- |
| ८ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.धानोरा वैद्य** ता.मुर्तिजापर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधारा **क्र.३** चे बांधकाम करणे | २१,३५,५०७/- |
| ९ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.पाराभवानी** ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधारा क्र.६ चे बांधकाम करणे | २०,४९,७२७/- |
| १० | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.जांब** ता.पातूर जि.अकोला येथील कोल्हापुरी पध्दत बंधारा **क्र.१ चे** बांधकाम करणे | १,२९,६६,३७०/- |
| ११ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.चोंढी** ता.पातूर जि.अकोला येथील व्दारयुक्त सिमेंट बंधारा **क्र.१** चे बांधकाम करणे | १,०७,४६,५९९/- |
| १२ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.हिंगणा उजाडे क्र.३, ४ व मौ.दिग्रस खु. क्र.१** ता.पातूर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधारा चे बांधकाम करणे | ९२,५५,२७६/- |
| १३ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.पिंपरडोळी** ता.पातूर जि.अकोला येथील व्दारयुक्त सिमेंट बंधारा क्र.२ चे बांधकाम करणे | ८७,३७,३६२/- |
| १४ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.खापरखेडा** ता.पातूर जि.अकोला येथील व्दारयुक्त सिमेंट बंधारा **क्र.१** चे बांधकाम करणे | ८७,२६,५४३/- |
| १५ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.तामसी** ता.बाळापूर जि.अकोला येथील व्दारयुक्त सिमेंट बंधारा क्र.१ चे बांधकाम करणे | ८३,१४,९९३/- |
| १६ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.पिंपळगाव** ता.बाळापूर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधारा **क्र.१ व २** चे बांधकाम करणे | ७०,६४,६५६/- |
| १७ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.पाचरण** ता.पातूर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधारा **क्र.१ व २** चे बांधकाम करणे | ६५,३०,३१६/- |
| १८ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.बटवाडी खु. क्र.३ व मौ.बटवाडी बु. क्र.१** ता.बाळापूर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधाऱ्याचे बांधकाम करणे | ५६,१६,८२३/- |
| १९ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.जांब** ता.पातूर जि.अकोला येथील ई-क्लास खोदतळयाचे काम करणे | ३३,८०,१८८/- |
| २० | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.वरणगाव** ता.पातूर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधारा **क्र.२** चे बांधकाम करणे | २६,४३,८४७/- |
| २१ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.गोळेगाव** ता.पातूर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधारा **क्र.१** चे बांधकाम करणे | २६,४०,७८२/- |
| २२ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.पाचरण क्र.५ व मौ.चीचखेड पिंपळखुटा क्र.२** ता.पातूर जि.अकोला येथील कंपोजीट गॅबीयन बंधाऱ्याचे बांधकाम करणे | १७,४०,०९५/- |
| २३ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.चिंचोली गणु** ता.बाळापूर जि.अकोला येथील कंपोजीट गॅबीयन बंधारा क्र.१ व २ चे बांधकाम करणे | १७,६२,५२९/- |
| २४ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.बटवाडी खु.** ता.बाळापूर जि.अकोला येथील कंपोजीट गॅबीयन बंधारा क्र.१ व २ चे बांधकाम करणे | १३,७०,८७५/- |
| २५ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.हिंगणा उजाडे** ता.पातूर जि.अकोला येथील ई-क्लास खोदतळे किरकोळ दुरुस्तीचे काम | ८,८२,३२९/- |
| २६ | जशिअ-२.० अंतर्गत मौ.**पिंपरडोली** ता.पातूर जि.अकोला येथील कोल्हापुरी पध्दत बंधारा **क्र.२ ची** किरकोळ दुरुस्तीचे काम | ८,७५,४६९/- |
| २७ | जशिअ-२.० अंतर्गत **मौ.वरणगाव** ता.पातूर जि.अकोला येथील सिमेंट नाला बंधाऱ्याची किरकोळ दुरुस्तीचे काम | ८,०९,८५२/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १६/१२/२०२५ (११.००) वा. ते २३/१२/२०२५ (१८.००)
ई-निविदा उघडणे :- दिनांक २६/१२/२०२५ (११.००)

खालील ठिकाणी ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ - http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अकोला कार्यालयातील सुचना फलकावर पाहावयास मिळेल.

जा.क्र.५६५८/ई-नि.सु.१८/२०२५-२६/२०२५ दिनांक १२/१२/२०२५
जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग
अकोला. नेहरु पार्कजवळ, मुर्तिजापूर रोड, अकोला

(अ. दि. मस्कर)
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग
अकोला

DGIPR-2025-26/No.-5/C4609


RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, १मला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येतील का?

: स्टेटलाईन :

सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com



माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीयमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांचा ८५ वाढदिवस बारा डिसेंबरला साजरा झाला. दोन दिवस अगोदर राजधानी नवी दिल्लीत त्यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या स्नेहभोजनाला विविध पक्षांचे दिग्गज नेते उपस्थित राहिले.

सत्तेवर असो किंवा नसो सर्व पक्षीय राष्ट्रीय नेत्यांना एकत्र आणण्याची किमया केवळ शरद पवारांकडे आहे हे पुन्हा दिसून आले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, प्रियंका गांधी वड्रा, मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू, कमलनाथ, मनीष तिवारी, तृणमूल काँग्रसचे खासदार सौगत रॉय, माजी केंद्रीयमंत्री डी. पुरंदेश्वरी, उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रफुल पटेल, जयंत पाटील, सुप्रिया सुळे, रोहित पवार यांची उपस्थिती होतीच पण देशातील मोठ्या उद्योग समुहाचे सर्वेसर्वा गौतम अदानी हेसुध्दा शरद पवारांच्या शेजारीच बसून होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदींनी त्यांना शुभेच्छा दिल्या.मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटरमधे आम जनतेसोबत त्यांचा वाढदिवस साजरा झाला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, रोहिणी खडसे. विद्या चव्हाण अशी टीम त्यांच्या बाजुला होती पण सर्व थरातील आणि सर्व वयोगटातील सामान्य लोकांच्या झुंडीच्या झुंडी सकाळपासून त्यांना शुभेच्छा देण्यासाठी येत होत्या. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती.

केंद्रात व राज्यात सत्तेच्या परिघात नसताना हजारोंची गर्दी तिथे लोटली होती. अडिच वर्षापूर्वी अजित पवार हे चाळीस आमदारांसह पक्ष घेऊन भाजपासोबत गेले, सत्तेत सहभागी झाले. त्यांना भाजपाने उपमुख्यमंत्रीपद दिले, त्यांचे आवडते अर्थमंत्रीपद त्यांना मिळाले. त्यांच्याबरोबर बंडात सामील झालेल्या दहा आमदारांना मंत्रीपदे मिळाली.

सोनिया गांधींच्या विदेशी जन्माच्या मुद्दयावरून शरद पवारांनी बंड करून १९९९ मधे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. राज्यातून डझनभर खासदार व पन्नास साठ आमदार निवडून आणण्याची आपली ताकद आहे व आपल्याला बरोबर घेतल्याशिवाय सरकार स्थापन करता येणार नाही हे त्यांनी दाखवून दिले.

शरद पवारांनी मोठे केलेले नेते, मंत्री अजितदादांबरोबर भाजपासोबत गेले आहेत. पण पक्षाचे कार्यकर्ते आणि शरद पवारांना मानणारी सर्वसामान्य जनता त्यांच्यावर आजही प्रेम करते हेच त्यांच्या वाढदिवसाला दिसून आले. अजित पवार आणि त्यांनी बरोबर नेलेल्या पक्ष संघटनेला अजून तरी भाजपाचे संरक्षक कवच आहे. भाजपाच्या कवचामुळेच त्यांच्या पक्षाला राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह मिळाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक व राजकारणात वर्षानुवर्षे किंगमेकर ओळखले जाणारे शरद पवार यांचे सत्तास्थापनेतील महत्व कमी करण्यात भाजपा यशस्वी झाली असेल पण त्यांचे वलय कमी झालेले नाही.

एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या विरोधात बंडाचा झेंडा फडकवला व चाळीस आमदारांसह ते भाजपासोबत गेले. उध्दव ठाकरेंप्रमाणे शरद पवारांनी अजितदादा व बंडखोर कंपनीला गद्दार ठरवले नाही. गेल्या अडिच वर्षात शरद पवारांनी आपल्या पुतण्याविषयी कटु शब्द उच्चारले नाहीत आणि पुतण्यानेही त्यांचा अनादर केला नाही. वसंतदादा पाटील शुगर इंस्टिट्यूट, रयत शिक्षण संस्था अशा दिड दोन डझन सार्वजनिक संस्थांवर काका पुतण्या पदाधिकारी आहेत. पण एकमेकांना कोणी पाण्यात बघितले नाही .

शरद पवारांना बंड हे काही नवीन नाही. १९७८ मधे वसंतदादांचे सरकार पाडून पुलोद सरकार स्थापन केले, तेव्हा त्यांच्यावर दादांच्या पाठित खंजीर खुपल्याची टीका झाली होती. वयाच्या ३८ वर्षी राज्याचे सर्वात तरूण मुख्यमंत्री होण्याचा विक्रम त्यांनी केला होता. पण नंतरच्या काळात वसंतदादांचा अवमान होईल असे त्यांनी कुठे वक्तव्य केले नाही.

पी. व्ही . नरसिंह राव यांच्या विरोधात काँग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढवून त्यांनी पक्षात स्वतःचा दरारा निर्माण केला होता. रावांच्या विषयी मनात कधी अढी बाळगली नाही. सोनिया गांधीच्या विदेशी जन्माच्या मुद्दयावरून शरद पवारांनी काँग्रेसमधे बंडाचा झेंडा फडकवला.

पण नंतर डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारमधे ते दहा वर्षे केंद्रात कृषीमंत्री होते. यामुळेच अजित पवारांनी केलेल्या बंडामुळे ते विचलीत झाले नाहीत.

राजकारणात गेली साडेसहा दशकाहूनअधिक काळ सक्रीय असलेल्या शरद पवारांची ओळख साहेब अशी आहे. अनेक अडचणी, संकटे व आजारांवर त्यांनी मात केली आहे. त्यांचा पुणे, मुंबई, दिल्ली असा त्यांचा प्रवास अखंड चालू असतो, पण राज्यात चांद्यापासून ते बांद्यापर्यंत सर्वत्र सर्वाधिक फिरणारा नेता अशी त्यांची प्रतिमा आहे.

तब्येत कशी आहे, असा प्रश्न पवारांना कधीच आवडत नाही. ते कधी थकलेले दिसत नाहीत. आजही वाचन भरपूर आहे. शेतीपासून ते कृत्रिम बुध्दीमत्ता अशा सर्व विषयात त्यांना रस आहे. लोकांची गर्दी हेच त्यांचे टॉनिक आहे.

राज्यात भाजपाने २०२९ ची निवडणूक स्वबळावर लढविण्याची तयारी सुरू केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ही त्याची सुरूवात आहे. २०२९ च्या निवडणुकीत कुबड्या फेकून द्यायच्या आहेत असे स्पष्ट आदेश अमित शहा यांनी मुंबईत पक्षाच्या बैठकीत दिले आहेत.

राज्यात सत्तेवर येण्यासाठी एकनाथ शिंदे व अजित पवार यांना बरोबर घेऊन ठाकरेंची शिवसेना व पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाचे खच्ची केलीच. पण आता शतप्रतिशत सत्ता प्राप्त करण्यासाठी एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या कुबड्या दूर करायला सुरूवात केली आहे. एकनाथ शिंदे हे सारखे दिल्लीला धावतात व अमितभाईंना भेटतात.

एकनाथ शिंदे किंवा अजित पवार यांचे राजकारणातील हायकमांड हे अमित शहा आहेत. अमित शहा हे भाजपाची ताकद कशी वाढेल याचा सदैव विचार करतात. शिंदे किंवा अजितदादांचा पक्ष मोठा करणे हे त्यांचे काम नाही. जे अमितभाईंच्या मनात आहे तेच राज्यात देवाभाऊ व रवींद्र चव्हाण करीत असतात.

एकनाथ शिंदे हे माघारी फिरू शकत नाहीत. त्यांना भाजपासोबत राहूनच राजकारण करावे लागणार आहे, पण अजितदादांना त्यांच्या काकांचा पर्याय आहे. काका - पुतण्यांनी तसे संबंधही ठेवले आहेत. भाजपा आपला विस्तार करीत असताना आपल्या पक्षाचा संकोच होणार हे अजितदादांना पूर्ण ठाऊक आहे.

आपले अस्तित्व, आपला पक्ष आणि आपले सहकारी यांच्या भवितव्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येऊ शकतील का, अशा चर्चेला शरद पवारांच्या वाढदिवासाच्या निमित्ताने उधाण आले आहे. ठाकरे ब्रँड जवळ येणार असेल तर काका -पुतण्या का नाही, असा प्रश्न विचारला जातो आहे. यावर काहीही होऊ शकते असे एक उत्तर आहे, सध्या तरी होकार किंवा नकार काहीच व्यक्त होताना दिसत नाही. मुंबई- ठाण्यात भाजपा व शिवसेना ( शिंदे ) यांची युती होणार असे दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी जाहीर केले आहे.

अन्य महापालिकांमधे व जिल्हा परिषदांमधेही असे होऊ शकते. मग अजितदादांचा पक्ष कुठे आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नाव महायुतीत कोणी घेत नाही. भाजपाने ठाणे व कोकणात शिंदेंच्या शिवसेनेला धक्का देण्याचे काम केले. उद्या अजितदादांच्या पक्षाला पुणे व पिंपरी - चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजपा हाच प्रयोग करू शकतो.

भाजपाच्या आक्रमक विस्तारवादापुढे एकनाथ शिंदे किंवा अजितदादा काहीच करू शकणार नाहीत. मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व नबाब मलिक करणार असतील तर ते भाजपाला मान्य नाही असे उघड बोलले जात आहे. उद्या ही मालिका वाढत जाऊ शकते. पक्षाच्या भविष्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र यावे अशी मानसिकता दोन्ही पक्षात वाढते आहे.

■ ■ ■

# मुंबईत मुलींचे अपहरण आणि राजकीय मौन सोयीस्कर गप्पीची भयावह किंमत

मुंबई देशाची आर्थिक राजधानी, स्वप्ननगरी, प्रगतीचे प्रतीक. मात्र याच शहरात दररोज मुलींच्या अपहरणाच्या, बेपत्ता होण्याच्या आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असताना एक गंभीर प्रश्न सातत्याने उपस्थित होतो.

या प्रश्नावर सर्व राजकीय पक्ष गप्प का आहेत? हे मौन केवळ दुर्लक्षाचे नाही, तर राजकीय इच्छाशक्तीच्या अपयशाचे ठळक लक्षण आहे. महिलांची सुरक्षितता राजकीय अजेंड्यावर का नाही? कारण महिलांची सुरक्षितता हा उद्घाटन करता येणारा प्रकल्प नाही.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919
pravinbagde@gmail.com

रस्ते, उड्डाणपूल, मेट्रो दिसतात; पण सुरक्षिततेचे परिणाम आकड्यांत आणि फलकांवर मांडता येत नाहीत. त्यामुळे हा मुद्दा निवडणुकीपुरता घोषणांमध्ये येतो, प्रत्यक्ष कृतीत नाही.

घटना म्हणून पाहण्याची मानसिकता, अपहरणाच्या घटना पोलिसी नोंदी बनतात, बातम्यांचे मथळे होतात आणि काही दिवसांत विसरल्या जातात. त्याकडे सामाजिक आपत्ती, प्रशासनिक अपयश आणि व्यवस्थात्मक दोष म्हणून पाहिले जात नाही. हीच मानसिकता गुन्हेगारीला खतपाणी घालते.

सत्ता आणि विरोधक जबाबदारीपासून पळ काढण्याचा प्रयत्न असते. सत्ताधाऱ्यांना कायदा-सुव्यवस्थेतील अपयश मान्य करायचे नसते; विरोधकांना सेलिंग पॉईंट न मिळाल्याने आक्रमक भूमिका घ्यायची नसते. परिणामी, लोकशाहीतील जाब विचारण्याची प्रक्रिया ठप्प होते. कायदे आहेत, पण भीती नाही. पोक्सो, महिला संरक्षण कायदे, आयपीसी कायद्यांची कमतरता नाही.

मात्र तपासातील विलंब, आरोपपत्र दाखल होण्यास लागणारा वेळ, साक्षीदार संरक्षणाचा अभाव आणि फास्ट ट्रॅक न्यायालयांची अपुरी संख्या, यामुळे गुन्हेगार निर्भय होतो. कायदा अस्तित्वात असणे आणि प्रभावी असणे यात मोठा फरक आहे. पोलिस यंत्रणेवरील वास्तववादी दडपण, मुंबई पोलिसांवर प्रचंड जबाबदारी आहे.

लोकसंख्या, स्थलांतर, झोपडपट्ट्या, संघटित गुन्हेगारी, व्हीआयपी बंदोबस्त, मनुष्यबळ, आधुनिक तंत्रज्ञान आणि राजकीय स्वायत्तते अभावी पोलिस एकटे पडतात. संपूर्ण दोष पोलिसांवर ढकलणे हा सोपा, पण धोकादायक मार्ग आहे.

महिला सक्षमीकरण, भाषण विरुद्ध वास्तव, महिला दिनी सन्मान, जाहिराती, योजना सगळे काही असते. पण जर मुलगी बसमध्ये, रेल्वेत, गल्लीमध्ये सुरक्षित नसेल, तर सक्षमीकरण ही केवळ शब्दांची माळ ठरते. सुरक्षितता ही सक्षमीकरणाची पहिली अट आहे.

माध्यमांची मर्यादा आणि जबाबदारी असते पण माध्यमे बातमी देतात, पण सातत्याने पाठपुरावा होत नाही. ब्रेकिंग न्यूज संपली की विषय संपतो. त्यामुळे राजकीय दबाव तयार होत नाही. माध्यमांची भूमिका केवळ बातमी देण्यापुरती नसून प्रश्न जिवंत ठेवण्याची आहे.

समाजाची सामूहिक जबाबदारी, हा प्रश्न केवळ सरकारचा नाही. त्याकरिता पालकांनी जागरूक राहणे, शाळांमधून संवेदनशील शिक्षण, समाजाने हस्तक्षेप करणे, नागरिकांनी तक्रार करण्याचे धैर्य दाखवणे, हे सगळे आवश्यक आहे.

मौन ही केवळ राजकीय नाही, तर सामाजिकही समस्या आहे. शेवटी मौन म्हणजे अप्रत्यक्ष सहभाग होय. आज जे राजकीय पक्ष गप्प आहेत, ते उद्या आम्हाला माहिती नव्हती असे म्हणू शकत नाहीत. कारण मौन म्हणजे अप्रत्यक्ष सहभाग आणि या सहभागाची किंमत निष्पाप मुलींना मोजावी लागत आहे.

पुढचा मार्ग केवळ घोषणा नव्हे तर, महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र कृती आराखडा, सीसीटीव्ही आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, जलद तपास व त्वरित शिक्षा, फास्ट ट्रॅक कोर्ट वाढवणे, पोलिसांना स्वायत्तता व संसाधने, हे उपाय तात्काळ राबवले पाहिजेत.

ज्या शहरात मुली सुरक्षित नाहीत, तिथे विकास, प्रगती आणि विश्वगुरूची स्वप्ने पोकळ ठरतात. आज जर राजकीय इच्छाशक्ती जागी झाली नाही, तर उद्या हा प्रश्न प्रत्येक घराच्या दारात उभा राहील आणि तेव्हा दोष देण्यासाठी कोणीही उरणार नाही.

■ ■ ■

# शासन आणि सुशासन यातील फरक?

आपणं लोकशाही व्यवस्थेचा स्विकार केला आहे. लोकशाही व्यवस्था म्हणजे- अब्राहम लिंकन यांच्या मते- ' लोकांचे सरकार, लोकांनी चालवलेले आणि लोकांसाठी असलेले शासन म्हणजे लोकशाही '. तर सामान्यपणे ज्या शासनपद्धतीत सत्ता जनतेकडे असते आणि जनता थेट किंवा अप्रत्यक्षपणे (लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून) राज्यकारभारात सहभागी होते,ती लोकशाही होय.

भारताने प्रतिनिधीक लोकशाहीचा स्विकार केला आहे. मतदानाव्दारे जनता आपला प्रतिनिधी निवडून विधीमंडळात पाठवते.त्यांचेव्दारे देशातील, राज्यातील कायदे बनवले जातात किंवा जुन्या कायद्यात सुधारणा करण्यात येते. यांस कायदेमंडळ असे संबोधले जाते.

देश किंवा राज्य चालवण्यासाठी असलेली सत्ता, यंत्रणा व व्यवस्था म्हणजे 'शासन' ! शासनाव्दारे कायद्याची, नियमांची अंमलबजावणी केली जाते. प्रशासन चांगल्या पध्दतीने चालवण्यासाठी अधिकारी लोकांना काही अधिकार प्रदान केले जातात.कुठल्याही दबावाला बळी न पडता आपले अधिकार वापरून जनहिताची कामें सरकारी नियमानुसार करणे हे अधिकारी वर्गाचे काम असते.

आजचे अधिकारीगण आपल्या डोक्याला लोकप्रतिनिधींचा ताप नको अशी भुमिका घेऊन वागत आहेत. या कारणाने लोकप्रतिनिधी अधिकाऱ्यांवर वरचढ ठरतात आहेत. ते नियमबाह्य कामे अधिकारी वर्गाकडून करवून घेतात आहेत. आता तर महाराष्ट्र शासनाने लोकप्रतिनिधींना अधिकारी वर्गानी सन्मानजनक वागणूक देण्यासाठीचे फर्मान काढले आहे.आमदारांचा अधिकाऱ्यांच्या दालनात प्रवेश होताच अधिकाऱ्यांनी उभे राहून त्यांचा सन्मान जपण्यास सांगितले गेले आहे. तसेच परतीला सुध्दा उभे राहण्यास सांगितले गेले आहे.

हा प्रकार अत्यंत चीड आणणारा आहे. याला अजून पर्यंत अधिकारी वर्गाच्या संघटनांनी विरोध दर्शविलेला नाही. हे गुलामीचे प्रतीक समजावे? यामुळे हुजरेगिरीच्या प्रमाणात वाढ झालेली पहायला मिळणार आहे. लोकशाही व्यवस्थेसाठी हे चांगले लक्षणं नाही.

मतदारांनी निवडून दिलेल्या लोकांमधून लोकप्रतिनिधी बहुमताने निवडले जातात. यातूनच शासनासाठी आवश्यक असलेली यंत्रणा निवडली जाते. यात सदस्य, मंत्रीगण, पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि कायद्याला अधिकृत स्विकृती देण्यासाठी आणि कारभारावर अंकुश ठेवण्यासाठी राष्ट्रपती, राज्यपाल यांची नियुक्ती बहुमताने केली जाते.

या सर्वांचे मिळून शासन बनते. केलेल्या कायद्यांची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करण्यासाठी आणि कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिकारी स्तराची निर्मिती केली गेली आहे. अधिकारीगण आपले अधिकार वापरून जनतेला योग्य सेवा पुरवीत असतात. ते यासाठी उत्तरदायी असतात.



मिलींद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ता,
स्वतंत्र पत्रकार
राजुरा, चंद्रपूर.
९५११२१५२००

लोकांना कायद्यानुसार योग्य न्याय मिळतो आहे किंवा नाही, केले गेलेले कायदे न्यायाच्या कक्षेत बसतात किंवा नाही हे तपासून पहाणे हे न्यायालयाचे काम आहे. यासाठी न्यायालयाची त्रिस्तरीय रचना केली गेली आहे. यात जिल्हा व तहसिल स्तरावरील अधिनस्त कनिष्ठ न्यायालये,उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय अशी रचना केली गेली आहे.

यातील निकालात कुठलाही समन्वय नसल्याने जनतेला न्याय मिळण्यास विलंब होतो आहे. कनिष्ठ न्यायालयाने दिलेला निर्णय जिल्हा न्यायालयात टीकत नाही.तर जिल्हा व उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय सर्वोच्च न्यायालयात टिकू शकेल याची शाश्वती नसल्याने न्याय मागणाऱ्यांची कुचंबणा होते आहे. तो हवालदील होतो.

याशिवाय कुठल्याही कायद्याने राष्ट्रपती, राज्यपाल व न्यायालये यांना विशिष्ट वेळेत निर्णय देण्याचे बंधन कायद्याने घालून दिलेले नसल्याने निवडून आलेले लोकप्रतिनिधी, राज्यपाल, राष्ट्रपती हे मनमानी पध्दतीने राज्य कारभार चालवीत आहेत.हे अनेकदा निदर्शनास आलेले आहे. यात योग्य त्या सुधारणा करणे हे कायदे मंडळाचे काम आहे. ते होत नसल्याने शासनातील समन्वयात बिघाड झालेली आढळून येत आहे.

सरकारी कारभार मनमानी पध्दतीने सुरू आहे.तसेच विरोधी पक्ष नेत्यांसाठी आवश्यक संख्यांबळाची अट घातली असल्याने यावर बोट ठेवून विरोधी पक्ष नेतेपद देण्यासाठी सत्ताधारी अडून बसले आहेत. यात सुधारणा झाली पाहिजे.

संसदेत, विधानसभेत विरोधी पक्षनेता नसेल तर विधीमंडळाचे कामकाज हे सुचारू पध्दतीने चालू शकत नाही.यात मनमानी पध्दतीने, कुठलिही चर्चा न करता गोंधळात विधेयके, कायदे मंजुर केली जातात. यामुळे विधेयकात, कायद्यात, अनेक त्रूटी आढळून येतात.

विधेयकाची, कायद्याची अंमलबजावणी करतांना अनेक अडथळे निर्माण होतात.त्यांचे निराकरण करणे कठीण जाते. शासन करणे सोपे काम आहे.परंतु सुशासन करणे हे अत्यंत कठीण काम असते.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सुशासन होते. म्हणून ते रयतेचे, जनतेचे राज्य, शासन मानले जात होते.

आज सगळीकडे शासन आहे.परंतु सुशासनाचा अभाव पदोपदी जाणवतो आहे. शासन निर्मिती प्रक्रीयेसाठी लोकशाहीतील निवडणुकांना अत्यंत महत्व प्राप्त झालेले असते. कारणं निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीं मार्फत जनतेचा सर्व कारभार हा चालत असतो.

आज आपली निवडणुक प्रक्रीया हीच बाधीत झालेली आहे. तीला पैश्याचे ग्रहणं लागलेले आहे. पैशांमधून सत्ताप्राप्ती आणि सत्ताप्राप्ती मधून पैसा निर्मिती असे चक्र सुरू झाले आहे. याच कारणाने निवडणुकपूर्व मोफत घोषणांची भडीमार केली जात आहे.जे नियमबाह्य, कायदाबाह्य कृत्य ठरते आहे.

याला कुणीही चॅलेंज देऊ शकत नाहीत.कारणं आपले कायदे यासाठी कमी पडतात आहेत. यात सुधारणा करण्याचे काम विधीमंडळाचे, लोकप्रतिनिधींचे आहे. ते यापासून स्वतःला दूर ठेऊ इच्छितात. यामुळे सर्वसामान्य,उच्च शिक्षीत व्यक्ती निवडणुक लढवू शकत नाही आहे.

हे सत्य स्विकारण्याची कुणाचीही तयारी नसल्याने लोकशाही प्रक्रीया बाधीत झाली आहे. मग सुशासनाची अपेक्षा तरी कशी करणार? आज विधीमंडळ, कार्यकारी मंडळ,न्याय पालिका आणि प्रसार माध्यमे यांना काळ्या पैश्याची बाधा झाली असल्याने आणि यावर कुणाचेही नियंत्रण राहिले नसल्याने लोकशाही व्यवस्थेचे अस्तित्वच धोक्यात आलेले आहे.

कायद्याचा धाक निर्माण होत नसल्याने सुशासन हा शब्दच कालबाह्य झाल्यासारखा वाटत आहे. सुशासन म्हणजे चांगले, लोकाभिमुख,जनतेला उत्तरदायी असणारे शासन! आज जनतेला प्रत्येक गोष्टींसाठी संघर्ष करावा लागतो आहे. जनतेला गरज नसलेल्या योजनांची भरमार केली जात आहे.

सर्व कामे कमिशनवर आधारीत केली जात असल्याने ती निकृष्ट दर्जाची होत आहेत. यामुळे आपले देशप्रेम हे किती तकलादू आहे हे कळून येते आहे. आपली राष्ट्रनिर्मिती, संसाधनांचा पायाच जर कच्चा असेल तर देशाची इमारत ही कशी मजबूत असणार आहे? याचा विचार करण्याची वेळ सुशिक्षीत लोकांवर प्रामुख्याने आलेली आहे.

हे आव्हान कसे पेलणार याचे उत्तर काळच देऊ शकणार आहे. कारणं आज कुणाचा मागमूस कुणाला राहिलेला नाही. कायदे लोक कोळून पीत आहेत. कायद्याचा धाक उरलेला नाही. गुंड प्रवृत्ती,भ्रष्टाचारी, अर्धशिक्षीत लोकांचा भरणा सत्तेत झाला आहे. हे सत्य स्विकारावेच लागेल. सुशासन ही तर फार दुरची गोष्ट राहिली.

■ ■ ■

वाचक लिहितात

## 'सनबर्न फेस्टिव्हल' मुंबईत नकोच!

सरत्या वर्षाच्या निमित्ताने मुंबईतील शिवडी भागात १७ ते २१ डिसेंबर या कालावधीत होणारा सनबर्न फेस्टिवल तरुणांना नशेच्या गर्तेत नेणारा असल्याचा आरोप विविध संघटनांकडून आणि नागरिकांकडून केला जात आहे.

याआधी गोवा राज्यात आणि गेल्या वर्षी महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात झालेला हा फेस्टिव्हल महिलांची छेडछाड आणि अमली पदार्थांचा वापर यामुळे वादात सापडला होता. तरीही यंदा या फेस्टिव्हलला मुंबईत परवानगी देण्यात आली आहे.

भारतीय संस्कृती जपणाऱ्या सण उत्सवांवर शासनाकडून लावली जाणारी बंधने सनबर्नसारख्या संस्कृती विघातक कार्यक्रमांसाठी मात्र शिथिल केली जातात. त्यामुळे सरकार नेमके जनतेचे कि संस्कृती भंजकांचे हा प्रश्न आता नागरिकांना पडला आहे.

आजच्या तरुणाईवर असलेल्या पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे हजारो रुपयांची तिकिटे खरेदी करून तरुण या कार्यक्रमांना हजेरी लावतात. तेथील आकर्षणाला भुलून त्यातील काहीजण पहिल्यांदाच अमली पदार्थाचे सेवन करतात. हळूहळू नशेच्या अधीन होऊन आयुष्याची राखरांगोळी करून घेतात.

सरकार एकीकडे छत्रपती शिवरायांचा आदर्श घेऊन राज्यकारभार करत असल्याच्या बातावण्या करते आणि दुसरीकडे संस्कृतीला काळिमा फासणारे कार्यक्रम राज्याच्या आर्थिक राजधानीत करण्याच्या परवानग्या देते, त्यामुळे संस्कृतीप्रिय नागरिकांनीच सरकारवर दबाव आणून हा फेस्टिवल हद्दपार करण्यास भाग पाडायला हवा !

■ ज्योती रावराणे, कांजूरमार्ग.

## बालपण डिजिटल संकटात

खासदार सुधा मूर्ती यांनी राज्यसभेच्या हिवाळी अधिवेशनात लहान मुलांच्या सामाजिक माध्यमांवर झळकण्याच्या प्रकाराविषयी महत्त्वाचे भाष्य केले आहे. त्यांनी मुलांना ऑनलाइन कंटेंट मशीन म्हणजेच ऑनलाइन सामग्री प्रसारित करणारी यंत्रे बनविण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याचे सांगितले. लहान वयात अशा प्रदर्शनामुळे मुलांची दीर्घकालीन मानसिक हानी होऊ शकते त्यामुळे सरकारने डिजिटल कंटेंट साठी नियम करण्याची मागणी केली. अनेक पालक जाणते-अजाणतेपणे मुलांच्या भावनिक विकासावर, गोपनीयतेवर आणि बालपणावर होणाऱ्या दीर्घकालीन परिणामांची जाणीव न ठेवता लाईक्स, व्हूज आणि कमाई साठी त्यांच्यावर सतत व्हिडिओमध्ये दिसण्यासाठी दबाव आणतात. बालपण हा खेळणे, शिकणे आणि निरागसता यांनी भरलेला टप्पा मानला जातो त्याऐवजी ऑनलाइन कंटेंट च्या प्रवाहात अडकल्यामुळे मुले स्वतःला मोबाईलच्या कॅमेरात बंदिस्त करतात त्यामुळे त्यांचे जीवन सामाजिक माध्यमांच्या हातात गेले आहे.

नृत्य, गाणे, नकला, विनोद, गोंडस बोलणे - हसणे ते पोशाखांच्या चित्रीकरणापर्यंत अनेक प्रकारच्या रिल्समध्ये मुले वारंवार दिसतात. ज्याचे व्हिडिओ अति वेगाने पसरतात त्यामुळे लहान मुले सार्वजनिक व्यक्तिरेखा बनू लागली आहे आणि अनोळखी लोकांकडून त्यांचे मूल्यांकनही होत आहे या दोन्हीचा अर्थ लहान मुलांना समजत नाही आणि पालकांना तो समजून घ्यायचा नाही अशी आजची स्थिती आहे. मुले लाईक आणि कमेंट्स वर अवलंबून राहू लागल्यामुळे खरे यश आणि आनंद याविषयीची त्यांची समज विकृत होऊ शकते पालकांनी हा धोका ओळखून ट्रेंड आणि अलगोरिदम पेक्षा मुलांवर संस्कार करणे, खेळ खेळायला लावणे, चांगल्या सवयी लावणे याकडे लक्ष केंद्रित करायला हवे. भारत सरकारने ही बालपणातील डिजिटल संकटाच्या निवारणासाठी नियम लागू करणे आवश्यक आहे त्यामुळे सामाजिक माध्यमांमुळे हरवत चाललेले मुलांचे बालपण सावरण्यासाठी भारत सरकारकडून कठोर नियमावलींची आणि कारवाईची अपेक्षा आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.

# थंडीच्या दिवसात निळी पडतात हाता-पायांची बोटं



हिवाळा सुरू होताच अनेक हंगामी आजार आपल्याला सतावू लागतात. अशातच आपण आपल्या आहारात हंगामानुसार बदल करत असतो जेणेकरून आपले शरीर तंदुरस्त राहील.

पण कधी कधी हिवाळा ऋतू सुरू झाला की वातावरणात गारवा वाढतो आणि यामुळे अनेक लोकांची बोटं अचानक पांढरे, निळी किंवा जांभळ्या रंगाचे होतात. यासोबत हाता-पायांच्या बोटांना मुंग्या येणे, वेदना आणि सूज येते. ही समस्या विशेषतः 40 वर्षांपेक्षा कमी वयाच्या महिलांमध्ये दिसून येते.

विशेषतः जी लोकं गरम आणि थंड पाण्यात बराच वेळ काम करतातकिंवा थंड वातावरणात बराच वेळ बाहेर राहून काम करतात त्यांच्याही हाता-पायांची बोटं सुन्न आणि काळी निळी पडतात. तर थंडीत हाता -पायांची बोटं निळी पडण्याचे कारण काय आहे ते आजच्या लेखात आपण जाणून घेऊयात.

रेनॉड सिंड्रोममध्ये जेव्हा तुमच्या हातां व पायांच्या बोटांचा संपर्क जेव्हा थंडीच्या दिवसात थंड पाण्यात व थंडीच्या संपर्कात आल्यावर बोटांमधील धमन्या आकुंचन पावतात. त्यामुळे बोटांना शुद्ध रक्त आणि ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो.

अशातच जेव्हा ऑक्सिजनची कमतरता जाणवल्यास प्रथम बोटं पांढरी, नंतर निळी आणि नंतर लाल होतात. रक्ताभिसरण थांबले की बोटं सुन्न होतात, बोटांची जळजळ होते आणि वेदना होतात. शिवाय असे जर वारंवार घडले तर बोटांवर जखमा देखील तयार होऊ शकतात. ही समस्या अचानक ताणामुळे देखील उद्भवू शकते आणि काही लोकांना 60 ते 70 अंश फॅरेनहाइटच्या मध्यम थंड तापमानात देखील लक्षणे जाणवू लागतात .

**कोणत्या लोकांना सर्वात जास्त धोका आहे?**

हॉटेल आणि केटरिंग उद्योगातील लोकं, व्हाइब्रेटिंग टूल्स वापरणे कामगार, वारंवार गरम आणि थंड पाण्याच्या संपर्कात हात ठेवणारे आणि घरकाम करणाऱ्या महिला अशा सर्वांना थंडीच्या दिवसात बोटं निळी पडण्याचा धोका सर्वाधिक असतो.

डॉक्टरांच्या मते, हिवाळ्यात हॉस्पिटलमध्ये बोटांची ही समस्या सतावल्यास सुमारे 60 टक्के रुग्ण येतात. जर थंडीच्या दिवसात हाता पायांची बोटं निळी पडल्यास बोटांच्या ऊतींचे नुकसान होऊ शकते.

रेनॉडचा संसर्ग टाळण्यासाठी खूप थंड पाण्यात काम न करण्याचा प्रयत्न करा, घरात अनवाणी चालणे टाळा, रेफ्रिजरेटरमध्ये हात ठेवणे किंवा त्याच्या समोर उभे राहणे टाळा . शिवाय डिटर्जंट किंवा कपडे धुण्याचा साबण थेट हातांना लावणे टाळा, लोकरीचे हातमोजे आणि मोजे घाला आणि भांडी धुताना नेहमी रबरचे हातमोजे घाला.

सुरुवातीला रेनॉडचा आजार औषधाने बरा होऊ शकतो , परंतु काही प्रकरणांमध्ये, बायोफीडबॅक तंत्रांचा वापर करून हातांचे तापमान नियंत्रित केले जाते . जर औषधांनी आराम मिळत नसेल, तर समस्या आणखी बिकट झाल्यास शस्त्रक्रिया करण्याचीही गरज भासू शकते.

■ ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## संत तेजस्वी महाराज

लोहाला परीस
स्पर्शुन जाणे
तैसे संत संगतीने
होते जीवनाचे सोने..।

संतांचा उपदेश म्हणजे
आत्मोध्दाराचे भोजन
ग्रहण करता जगी
भाऊ अमर होते जीवन..।

अशीच एक विभुती
ग्राम वरोडीला स्थिरावली
संत तेजस्वी महाराज
नावाने लोकमान्य झाली..!

जरी झाले समाधिस्त
मनी ठेवता दृढ भाव
नाम स्मरता श्रध्देने
अनुभूती येईल राव ..!

## डिजिटल पेमेंट्समध्ये नवीन वापरकर्ते जोडण्यासाठी भीमने सुरू केली गर्व से स्वदेशी मोहीम

**नागपूर, १५ डिसेंबर :** एनपीसीआय भीम सर्व्हिसेस लिमिटेडद्वारे यांनी विकसित केलेल्या स्वदेशी डिजिटल पेमेंट्स प्लॅटफॉर्म भीम (भीम) पेमेंट्स ॲपने आज गर्व से स्वदेशी मोहिमेच्या शुभारंभाची घोषणा केली. या मोहिमेचा उद्देश देशभरातील नवीन वापरकर्त्यांना डिजिटल पेमेंट्स स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. या महिन्याच्या अखेरीस भीम आपल्या स्थापनेच्या १०व्या वर्षात प्रवेश करत आहे. हा महत्त्वाचा टप्पा साजरा करण्यासाठी, भीम ने नवीन वापरकर्त्यांसाठी २० किंवा त्याहून अधिक रकमेच्या कोणत्याही व्यवहारावर थेट २० कॅशबॅक ऑफर सुरू केली आहे.

एनबीएसएलच्या व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) ललिता नटराज म्हणाल्या, भीम हे डिजिटल, आत्मनिर्भर भारताच्या आत्मविश्वासाचे प्रतीक असून, भारतीय नागरिक दररोज ज्या पद्धतीने व्यवहार करतात त्याचेही ते प्रतिनिधित्व करते. गर्व से स्वदेशी ही मोहीम या संकल्पनेवर आधारित आहे की, एक स्वदेशी आणि सार्वभौम पेमेंट प्लॅटफॉर्म भारतीय वापरकर्त्यांच्या वास्तव गरजा लक्षात घेऊन विकसित केला गेला पाहिजे. आमचा भर पहिल्यांदाच डिजिटल पेमेंट्स वापरणाऱ्या वापरकर्त्यांना या प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यावर आणि त्यांना दैनंदिन गरजांसाठी सुरक्षित व शाश्वत पेमेंट सवयी विकसित करण्यास मदत करण्यावर आहे. या मोहिमेद्वारे, आम्ही भीम ॲपला पसंतीचे पेमेंट ॲप बनवण्याचे तसेच भारतीय घरगुती व्यवहारांचा एक स्वाभाविक भाग बनवण्याचे ध्येय ठेवले आहे.

एकदा वापरकर्ते किराणा सामान, बस किंवा मेट्रो तिकिटे, प्रीपेड रिचार्ज, वीज व गॅस बिलांचे पेमेंट तसेच इंधनाच्या खर्चासाठी हे ॲप वापरण्यास सुरुवात करतील, तेव्हा पात्र व्यवहारांवर त्यांना एका महिन्यात ३०० पर्यंत कॅशबॅक मिळू शकतो.

या वर्षाच्या सुरुवातीला लाँच करण्यात आलेले नवीन भीम ॲप १५ पेक्षा अधिक भारतीय भाषांचे समर्थन करते, जाहिरात-मुक्त इंटरफेस प्रदान करते आणि कमी कनेक्टिव्हिटी असलेल्या भागांसाठी विशेषतः ऑप्टिमाइझ करण्यात आले आहे. यामध्ये स्प्लिट एक्सपेंसेस, फॅमिली मोड, स्पेंड ॲनालिटिक्स, ॲक्शन नीडेड आणि यूपीआय सर्कल यांसारखी नवी वैशिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली असून, त्यामुळे संपूर्ण भारतातील वापरकर्त्यांसाठी एक व्यावहारिक, विश्वासार्ह आणि वापरण्यास सोपा डिजिटल पेमेंट साथीदार म्हणून भीम ची भूमिका अधिक मजबूत झाली आहे.

## मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल येथे ब्रेन डेड रुग्णाच्या अवयवदानामुळे अनेकांना नवजीवन मिळाले



**नागपूर, १५ डिसेंबर :** मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूर येथे ब्रेन डेड घोषित झालेल्या ५६ वर्षीय रुग्ण मंदा भाटकर यांच्या कुटुंबाने अवयवदान करण्याचा निःस्वार्थ निर्णय घेतला. या निर्णयामुळे तीन जणांना नवीन जीवन मिळाले आणि इतर दोन व्यक्तींचे जीवन अधिक समृद्ध झाले. ७ डिसेंबर रोजी मेंदूतील ॲन्युरिझममुळे झालेल्या रक्तस्रावामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी त्यांना वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, मात्र ११ डिसेंबर रोजी त्यांना ब्रेन डेड घोषित करण्यात आले. अतिदक्षता विभागातील वैद्यकीय पथकाकडून समुपदेशन झाल्यानंतर कुटुंबीयांनी त्यांचे दोन्ही किडनी, यकृत आणि डोळ्यांचे कॉर्निया (नेत्रपटल) दान करण्याचा निर्णय घेतला.

त्यांच्या एका किडनीचे प्रत्यारोपण ४३ वर्षीय गृहिणीमध्ये करण्यात आले. त्या २०२२ पासून डॉ. निशांत देशपांडे, डायरेक्टर-नेफ्रोलॉजी यांच्या देखरेखीखाली दीर्घकालीन मूत्रपिंड विकारासाठी उपचार घेत होत्या. डायलिसिसची गरज आठवड्यातून चार वेळा वाढल्याने त्यांचे नाव २० मार्च २०२३ रोजी प्रत्यारोपण प्रतीक्षा यादीत नोंदवण्यात आले होते. यकृताचे प्रत्यारोपण ३५ वर्षीय व्यावसायिकामध्ये करण्यात आले. तो डिसेंबर २०२४ पासून डॉ. अमित गुल्हाने, प्रिन्सिपल कन्सल्टंट गॅस्ट्रोएन्टेरॉलॉजी व ट्रान्सप्लांट हेपॅटोलॉजी यांच्या देखरेखीखाली दीर्घकालीन यकृत निकामी होण्याच्या आजारासाठी उपचार घेत होता. गेल्या एका वर्षात पोटात पाणी साचण्याच्या (ॲसाइटिस) उपचारासाठी त्याला अनेकदा रुग्णालयात दाखल करावे लागले होते. शेवटच्या टप्प्यातील यकृत निकामी झाल्यामुळे मार्च २०२५ मध्ये त्याचे नाव प्रत्यारोपण प्रतीक्षा यादीत समाविष्ट करण्यात आले होते. या दोन्ही प्रत्यारोपण शस्त्रक्रिया मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूर येथे यशस्वीपणे पार पडल्या.

दुसरी किडनी सरस्वती किडनी केअर सेंटरला देण्यात आली, तर डोळ्यांचे कॉर्निया नागपूर येथील एलएमएच आय बँकला दान करण्यात आले. सर्व अवयव आणि ऊतकांचे वाटप नागपूर झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटरच्या मार्गदर्शनानुसार करण्यात आले.

या प्रत्यारोपण शस्त्रक्रियांचे नेतृत्व डॉ. गौरव चौबल, संचालक लिव्हर व मल्टी ऑर्गन ट्रान्सप्लांट, डॉ. राजविलास नारखेडे, संचालक लिव्हर ट्रान्सप्लांट सर्जरी आणि डॉ. संजय कोलते, संचालक व प्रमुख युरोलॉजी व किडनी ट्रान्सप्लांट यांनी केले.

डॉ. बिपीन जिभकटे, प्रिन्सिपल कन्सल्टंट क्रिटिकल केअर मेडिसिन यांनी सांगितले की, रुग्णाच्या मेंदूमधील एका रक्तवाहिनीत फुग्यासारखी गाठ (ॲन्युरिझम) तयार झाली होती, जी फुटल्यामुळे अचानक रक्तस्राव झाला. रक्तस्राव थांबवण्यासाठी आणि मेंदूवरील दाब कमी करण्यासाठी जीव वाचवणारी शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र रुग्णाच्या मेंदूला कायमस्वरूपी इजा झाली आणि दोन एपनिया चाचणीनंतर त्यांना ब्रेन डेड घोषित करण्यात आले, असे डॉ. जिभकटे यांनी सांगितले. चर्चा व समुपदेशनानंतर कुटुंबीयांनी त्यांच्या अवयवदानाचा निःस्वार्थ निर्णय घेतला.

अवयवदानाबाबत बोलताना डॉ. देशपांडे म्हणाले, या अवयवदानामुळे मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असलेल्या अनेक रुग्णांपैकी दोन कुटुंबांना नवीन जीवन मिळाले आहे. मेंदू मृत झालेल्या दात्यांकडून वेळेत अवयव काढणे आणि प्रत्यारोपण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हा निःस्वार्थ निर्णय अवयवदानाबाबत जागरूकता आणि ठोस उपक्रमांची तातडीची गरज अधोरेखित करते.

डॉ. गुल्हाने म्हणाले, ब्रेन डेड झालेल्या आपल्या प्रिय व्यक्तीचे अवयव दान करण्याचा कुटुंबाचा निर्णय हा अत्यंत करुणामय आणि निःस्वार्थ आहे. भाटकर यांनी दिलेले जीवनदान हे उदारता आणि धैर्याचे कायम स्मरणात राहणारे उदाहरण आहे. अशा कथा आशा निर्माण करतात आणि एकच जीवन अनेकांचे जीवन उजळवू शकते, हा विश्वास अधिक मजबूत करतात.

## सॅमसंग सीईएस २०२६ मधील द फर्स्ट लूक या कार्यक्रमात आपल्या डीएक्स व्हिजनची घोषणा करणार आहे

**मुंबई, १५ डिसेंबर :** सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स ४ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता (पीएसटी) ५ जानेवारी रोजी सकाळी ८.३० वाजता आयएसटी विन लास वेगासमधील लटूर बॉलरूम येथे द फर्स्ट लूक या कार्यक्रमाचे आयोजन करणार आहे. हा कार्यक्रम जगातील सर्वात मोठ्या आयटी आणि ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स प्रदर्शन सीईएस २०२६ च्या उद्घाटनापूर्वी दोन दिवस आधी होणार आहे.

या कार्यक्रमात सॅमसंग २०२६ साठी डिव्हाइस एक्सपीरियन्स (डीएक्स) विभागाबाबत आपली दृष्टी सादर करणार असून, एआयवर आधारित नवे ग्राहक अनुभवही दाखवले जाणार आहेत. डिव्हाइस एक्सपीरियन्स (डीएक्स) विभागाचे सीईओ आणि प्रमुख टीएम रोह हे द फर्स्ट लूक कार्यक्रमाचे मुख्य वक्ते असतील. तसेच व्हिज्युअल डिस्प्ले (व्हीडी) बिझनेसचे अध्यक्ष आणि प्रमुख एसडब्ल्यू यॉन्ग, तसेच डिजिटल अप्लायन्सेस (डीए) बिझनेसचे एक्झिक्युटिव्ह व्हाइस प्रेसिडेंट आणि प्रमुख चेओलगी किम हेही मंचावर उपस्थित राहून येत्या वर्षासाठी आपल्या-आपल्या बिझनेसच्या दिशा मांडतील. हा कार्यक्रम सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर आणि सॅमसंग न्यूजरूमवर थेट प्रक्षेपित केला जाईल. तसेच कंपनीच्या मोफत, जाहिरात-आधारित टीव्ही स्ट्रीमिंग सेवेसाठी असलेल्या सॅमसंग टीव्ही प्लसवरही तो पाहता येईल. याशिवाय, विन लास वेगास येथील कंपनीच्या विशेष प्रदर्शनात ७ जानेवारीपर्यंत सॅमसंगचे अनेक इतर विविध कार्यक्रम आणि प्रदर्शनेही आयोजित केली जाणार आहेत.

## भारताच्या सर्वाधिक लोकप्रिय जिंगलसाठी आनंद करीर यांच्या बोईंग ब्रँडव्हर्टायझिंगने केली एका नवीन धाडसी अध्यायाची रचना!



**मुंबई, १५ डिसेंबर :** सुप्रसिद्ध ॲड-मॅन आणि चित्रपटकर्ते, आनंद करीर, यांची क्रिएटिव एजन्सी, बोईंग ब्रँडव्हर्टायझिंगने, नवीन निरमा अडव्हान्स टी व्ही सी ची निर्मिती केली आहे. केरळ, हिमाचल प्रदेश आणि पंजाब इथे तब्बल सोळा दिवसांच्या सखोल चित्रीकरणानंतर तयार झालेल्या या नवीन फिल्ममधील तुम्हाला गुंतवून टाकणाऱ्या कथाकथनामध्ये, शिस्तबद्ध मांडणीमध्ये, आणि भव्य दृश्यात्मक अनुभवामध्ये, बोईंग ब्रँडव्हर्टायझिंगचा ठसा ठळकपणे दिसून येतो.

नवीन जाहिरातीमध्ये, मूळच्या जिंगलमधले ते अविस्मरणीय गीत तसेच ठेवून, त्यात नवीन शब्द आणि नवी हूक लाइन वापरण्यात आली आहे तुझसा ही निरमा है. ते रमणीय आठवणीतील गीत आणि आधुनिकता यांचं अनोखं मिश्रण सादर करण्यासाठी, बोईंग ब्रँडव्हर्टायझिंगने दोन जबरदस्त स्वरांना एकत्र आणलं दलेर मेहंदी आणि वैशाली सामंत ज्यांच्या विभिन्न पण तरीही एकमेकांना पूरक अशा शैलींमुळे या गाण्यातील आंतरिक भावना आणि रुबाब अधिकच वृद्धिंगत झाला आहे.

ही जाहिरात मोहीम म्हणजे बोईंगच्या अंतर्भूत दृढ विश्वासाचं प्रतीक आहे : अशा गोष्टी रचायच्या ज्या ताज्या, प्रचलित आणि भावनिक दृष्ट्या सजीव असतील. गेल्या कित्येक वर्षांत, एजन्सीने पॉलिसीबजार डॉट कॉम, पैसाबझार डॉट कॉम, निरमा ब्युटी सोप, निरमा सॉल्ट, फिनोलेक्स फॅन्स, फिनोलेक्स स्विचेस, लिव्हप्यूअर वॉटर प्यूरिफायर, अँकर रिएल्टी, किचन एक्सप्रेस स्पाइसेस, अमेझोन इंडिया, विठोबा आयुर्वेदिक ओरल केअर, यशदा रिएल्टी, आणि पॅपिलॉन पर्सनलाइझ्ड फर्निचर अशा कित्येक नामांकित ब्रँड्ससाठी लक्षवेधी जाहिरातींच्या रचना केल्या आहेत.

या नवीन जाहिरात मोहिमेबद्दल बोलताना, बोईंग ब्रँडव्हर्टायझिंगचे संस्थापक आणि प्रमुख क्रिएटीव्ह डायरेक्टर, आनंद करीर म्हणाले, गेल्या दोन वर्षांच्या अविरत मेहनतीनंतर, कित्येक रात्री उशीरापर्यंत, अखंड चर्चांमधून, आम्ही एका अशा स्वप्नाचा पाठलाग करत होतो जे कधीच भंगलं नाही.. आणि त्यातून आता आम्ही आमची नवीन निरमा ॲडव्हान्स फिल्म जगासमोर आणत आहोत. निरमा हा फक्त एक ब्रँड नाही, ती एक अशी जाणीव आहे जिच्याबरोबर आम्ही लहानाचे मोठे झालो. त्यामुळे, अशा या लोकप्रिय जिंगलसाठी काम करायला मिळणं ही माझ्यासाठी आणि माझ्या टीमसाठी एक प्रतिष्ठेची आणि तितकीच जबाबदारीचीही गोष्ट होती. त्यामुळे, आम्ही बोईंग ब्रँडव्हर्टायझिंग मध्ये, एकामागून एक अशी कित्येक व्हर्जन्स ( आवृत्त्या) लिहीत गेलो.

## इव्होनिथ स्टीलने वर्ध्यात कम्युनिटी स्पोर्ट्स डि चे आयोजन केले, ज्यात २० गावांमधील १,००० हून अधिक लाभार्थी झाले सहभागी



**नागपूर, १५ डिसेंबर :** एव्होनिथ स्टील या अग्रेसर पोलाद उत्पादक कंपनीने ९ आणि १० डिसेंबर रोजी नागपूर येथील वर्धा प्रकल्पात दोन दिवसीय कम्युनिटी स्पोर्ट डे चे यशस्वी आयोजन केले, ज्यामुळे समाज कल्याण, शारीरिक तंदुरुस्ती आणि सामाजिक समावेशकता यांप्रती असलेली आपली वचनबद्धता अधिक दृढ झाली. या उपक्रमामुळे आसपासच्या २० गावांमधील लाभार्थी एकत्र आले आणि क्रीडा, सलोखा व सामूहिक सहभागासाठी एक उत्साही व्यासपीठ निर्माण झाले.

या कार्यक्रमात खो-खो, कबड्डी आणि क्रिकेटसह विविध पारंपरिक आणि लोकप्रिय खेळांचा समावेश होता, ज्यामुळे सर्व वयोगटांतील पुरुष आणि महिलांना सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळाले. १,००० हुन अधिक लाभार्थी सहभागी झाल्यामुळे, गेल्या वर्षाच्या तुलनेत सहभाग जवळपास दुप्पट झाला, ज्यामुळे स्थानिक समाजामध्ये खेळ आणि शारीरिक हालचालींबद्दल उत्साह वाढलेला दिसून येतो.

इव्होनिथ स्टीलचे अध्यक्ष जय सराफ म्हणाले, खेळ हा लोकांना एकत्र आणण्याचे नेहमीच एक शक्तिशाली माध्यम राहिला आहे आणि या कम्युनिटी स्पोर्ट डेने सामाजिक बंध दृढ करण्याची आणि निरोगी जीवनशैलीला चालना देण्याची त्याची क्षमता सिद्ध केली. इव्होनिथमध्ये, आमचा विश्वास आहे की जबाबदार विकास हा आता आमच्या कार्याच्या पलीकडे जाऊन आम्ही ज्या समुदायांशी जोडलेले आहोत, त्या समुदायांपर्यंत पोहोचतो. सहभागींनी दाखवलेली ऊर्जा आणि उत्साह शारीरिक शिक्षण आणि समाज-नेतृत्व असलेल्या उपक्रमांबद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन दर्शवतो.

ही केवळ एक स्पर्धात्मक घटना नसून, या उपक्रमाने ग्रामीण तरुणांमध्ये सक्षमीकरण, लैंगिक समावेशकता आणि आत्मविश्वास वाढवण्यावर भर दिला. महिला आणि तरुण सहभागींना सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणारे सर्वसमावेशक वातावरण निर्माण करून, या कार्यक्रमाने टीमवर्क, समानता आणि आत्मविश्वास या मूल्यांना बळकटी दिली.

गावकऱ्यांकडून मिळालेल्या प्रचंड प्रतिसादाने या कार्यक्रमाचे यश दिसून आले आहे आणि ज्या प्रदेशांमध्ये कंपनी कार्यरत आहे, त्या प्रदेशांमध्ये महत्त्वपूर्ण सामाजिक प्रभाव निर्माण करण्यावर आणि सर्वांगीण सामाजिक विकासाला पाठिंबा देण्यावर इव्होनिथ स्टीलचा सतत भर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

## आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ H1-FY2026 मध्ये ९९.३३% क्लेम सेटलमेंट रेशोसह आघाडीवर

**अमरावती, १५ डिसेंबर :** आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने H1-FY2026 मध्ये उद्योगातील सर्वाधिक असा ९९.३३% क्लेम सेटलमेंट रेशो नोंदवला आहे, जो देशातील प्रमुख जीवन विमा कंपन्यांमध्ये सर्वाधिक मानला जातो. महत्त्वाचे म्हणजे, नॉन-इन्व्हेस्टिगेटेड क्लेम्ससाठी कंपनीचा सरासरी क्लेम सेटलमेंट टर्नअराउंड वेळ केवळ १.१ दिवस होता. या कालावधीत कंपनीने सेटल केलेल्या मृत्यू दाव्यांची एकूण रक्कम ८९३.३८ कोटी इतकी होती.

आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सचे चीफ ऑपरेशन्स ऑफिसर अमिश बँकर म्हणाले, आमची क्लेम सेटलमेंट प्रक्रिया ग्राहकांचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी डिझाइन केली आहे आणि प्रत्येक दाव्याची हाताळणी आम्ही अत्यंत संवेदनशीलतेने करतो.

H1-FY2026 मध्ये आमचा क्लेम सेटलमेंट रेशो ९९.३३% इतका होता आणि नॉन-इन्व्हेस्टिगेटेड क्लेम्ससाठी सरासरी टर्नअराउंड वेळ फक्त १.१ दिवस होती. याशिवाय, याच काळात आम्ही ८९३.३८ कोटींचे मृत्यू दावे सेटल केले, असे त्यांनी सांगितले.

आमचा ग्राहक-प्रथम दृष्टिकोन आणि डिजिटलायझेशनवर असलेला ठाम भर आम्हाला जलद क्लेम सेटलमेंट करण्यास सक्षम करतो, ज्यामुळे कुटुंबांना सर्वात कठीण वेळी वेळेवर आर्थिक मदत मिळते. मोबाईल ॲप, व्हॉट्सॲप, चॅटबॉट आणि वेबसाइटसारख्या सुविधाजनक प्लॅटफॉर्ममुळे दावेदारांना क्लेम नोंदवणे आणि त्याचा स्टेटस पाहणे अधिक सोपे झाले आहे.

लक्षणीय म्हणजे, आमच्या क्लेम फॉर शुअर या उपक्रमांतर्गत ज्यात सर्व कागदपत्रे सादर केल्यानंतर पात्र दावे एकाच दिवशी सेटल करण्याची हमी दिली जाते H1-FY2026 मध्ये आम्ही १५७.२५ कोटींचे मृत्यू दावे सेटल केले आहेत. तसेच, आमचा मागील तिमाहीतही उद्योगातील सर्वाधिक क्लेम सेटलमेंट रेशो कायम राहिला Q1-FY2026 मध्ये तो ९९.६०% होता.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या भक्कम पायावर देश पुढे वाटचाल करत आहे

**मुंबई, १५ डिसेंबर :** वीर सावरकरांच्या आदर्शांचे अनुसरण करणाऱ्या नवीन भारताचे शिल्पकार म्हणून शाह यांची प्रतिमा अधिक स्पष्ट होते, जेव्हा एक सामान्य भारतीय अंदमान आणि निकोबारच्या पवित्र भूमीत उभा राहूनइतिहासाची पाने वर्तमानाशी जोडताना पाहतो. श्री विजयपुरममध्ये वीर सावरकरांच्या सागरा प्राण तळमळला या कवितेचा ११५ वा वर्धापन दिन हा केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम नव्हता, तर भारताला गुलामगिरीतून स्वातंत्र्याकडे नेणाऱ्या चेतनेचा उत्सव होता. सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर, ही तीच भूमी आहे जिथे दुःख, त्याग आणि देशभक्ती यांनी एकत्रितपणे भारताच्या आत्म्याला आकार दिला.

अंत्योदयाच्या राजकारणाचे पालन करणाऱ्या शाह यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते इतिहास केवळ स्मृती म्हणून नव्हे तर प्रेरणा म्हणून सादर करतात. अंदमान आणि निकोबार आता केवळ बेटांचा समूह राहिलेला नाही, तर असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या तपश्चर्या, त्याग आणि अटळ देशभक्तीची एक चैतन्यशील भूमी बनली आहेत. येथेच वीर सावरकरांनी त्यांच्या आयुष्यातील सर्वात कठीण क्षण घालवले आणि येथेच सुभाषबाबूंचे स्वप्न साकार झाले. जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या बेटांना 'शहीद' आणि 'स्वराज' असे नाव दिले, तेव्हा तो केवळ नामकरण समारंभ नव्हता, तर आझाद हिंद फौज आणि सुभाषबाबूंच्या स्वप्नांना साकार करण्याचा धाडसी निर्णय होता.

भारतीय राजकारणाला एक नवीन वैचारिक ओळख देणाऱ्या शाह यांच्या दृष्टिकोनातून, सावरकर हे केवळ भूतकाळातील नायक नाहीत, तर वर्तमान आणि भविष्यासाठी मार्गदर्शक आहेत. वीर सावरकरांच्या पूर्ण आकाराच्या पुतळ्याचे अनावरण सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पाया रचणाऱ्या विचारसरणीचे प्रतीक बनले. हा पुतळा येणाऱ्या दशकांपर्यंत तरुणांना आठवण करून देत राहील की देशभक्ती केवळ शब्दांतूनच नाही तर धैर्य, कर्तव्य आणि समर्पणातूनही जिवंत राहते.

जेव्हा राष्ट्रवादी चेतनेचे जागरूक रक्षक शाह वीरतेबद्दल बोलतात तेव्हा त्याची परिभाषाच बदलून जाते. वीर सावरकरांनी शिकवले की वीरता म्हणजे भीतीचा अभाव नसून भीतीची जाणीव ठेवून त्यावर विजय मिळवणे आहे. हीच खऱ्या वीराची ओळख आहे. सागरा प्राण तळमळला सारख्या कविता या भावनेची सर्वोच्च अभिव्यक्ती आहेत, जिथे देशभक्ती शब्दांच्या पलीकडे जाते आणि आत्म्याची आर्त हाक बनते.

संस्कृती आणि आधुनिकतेचे पूल बांधणारे शाह, सावरकरांचे बहुआयामी व्यक्तिमत्व प्रकट करतात. समुद्रासारखे अंतहीन असलेल्या सावरकरांना एकाच पुस्तकात, कवितेत किंवा चित्रपटात मर्यादित करणे कठीण आहे. लेखक, कवी, योद्धा, समाजसुधारक आणि जन्मजात देशभक्त हे सर्व गुण एकाच व्यक्तीमध्ये साकारले गेले होते. गद्य आणि कविता दोन्हीवर समान प्रभुत्व असलेल्या सावरकरांनी भाषेला समृद्ध करण्यासाठी शेकडो नवीन शब्द दिले. जेव्हा सामान्य माणसाला आपल्या भाषेचा अभिमान वाटतो तेव्हा कुठे ना कुठे सावरकरांचे योगदानही त्यात समाविष्ट असते.

हिंदुत्वाची आधुनिक व्याख्या पुढे नेणाऱ्या शाह यांच्या विचारांमध्ये सावरकरांचे जीवन एक आदर्श उदाहरण म्हणून समोर येते. सावरकरांचे हिंदुत्व हे परंपरा आणि आधुनिकतेचे उल्लेखनीय मिश्रण होते. अस्पृश्यतेसारख्या वाईट गोष्टींविरुद्ध लढणे, समाजाच्या विरोधाला न जुमानता सुधारणेच्या मार्गावर ठामपणे पुढे जाणे - या सर्व गोष्टी सावरकरांना त्यांच्या काळाच्या पुढे जाणारे विचारवंत बनवतात.

बलिदानाची भावना जन-जनांपर्यंत पोहोचवणाऱ्या शाह यांच्या कथनात सावरकरांचे जीवन म्हणजे त्यागाची पराकाष्ठा आहे. सलग दोन जन्मठेपेची शिक्षा भोगूनही, मातृभूमीच्या गौरवगानासाठी साहित्यनिर्मिती करणे ही साधी गोष्ट नव्हे. भारतमातेच्या सेवेला सर्वापेक्षा श्रेष्ठ मानणाऱ्या आत्मबलिदानाच्या भावनेचा हा जिवंत पुरावा आहे.

नवीन भारताची कहाणी घडवणाऱ्या शाह यांच्या मते, आज देशासाठी मरण्याची गरज नाही, तर देशासाठी जगण्याची गरज आहे. जर प्रत्येक तरुणाने आपापल्या क्षेत्रात भारत सुरक्षित आणि समृद्ध करण्याचा संकल्प केला, तर तेच सावरकरांनी पाहिलेले भारताचे स्वप्न साकार होईल. सामान्य माणसाच्या दृष्टिकोनातून पाहिले तर, ही हीच ती कथा आहे जिथे इतिहास, वर्तमान आणि भविष्य एकमेकांचा हात धरून पुढे जाताना दिसतात- आणि त्या कथेचा नायक आजच्या भारतात सावरकरांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादी वारशाला जिवंत करणारे नेतृत्व म्हणून उदयास येतो.


## आज का अंदाज

### मंगळवार १६ डिसेंबर २०२५

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | मुंबई बाजार पत्थर फोड एकच |
|---|---|
| ० - १ - ४ - ७ | ३ - ५ - ६ - ९ |
| ३८९ - ५८८ - २५७ - १७९ | १६६ - ६९० - ६०० - ४५० |
| ४७९ - ३३५ - १५८ - ३५९ | २२९ - ३४८ - १६९ - ३६० |
| ५६९ - २९० - ३५६ - ४४९ | ३०० - १४० - २६८ - २७० |
| **जोडी** | **जोडी** |
| ०२ - १२ - ४३ - ७३ | ३१ - ५१ - ६२ - ९२ |
| ०५ - १५ - ४६ - ७६ | ३० - ५० - ६४ - ९४ |
| ०८ - १८ - ४९ - ७९ | ३७ - ५७ - ६८ - ९६ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस १६ डिसेंबर

मंगळवार १६ डिसेंबर २०२५

सर्व बाजार साठी

२१ - ६१ - ५८ - ९८
२४ - ६४ - ५७ - ९७
२३ - ६३ - ५० - ९०

११० - ७९० - ११३ - २७०
६७९ - ३३० - ४४७ - ४६९
३३६ - ४४८ - ३५७ - ३६०

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | ६०० | ३७० | २८८ | ४८० | १५९ |
| २३८ **३** | ५५६ **६** | ४६० **०** | ३५० **८** | ३९० **७** | ६९० **५** |
| २६६ | २४० | ५५० | १३४ | २०० | ७८० |

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| ४४६ | १५९ | ११४ | १३८ | १७० | १२६ |
| ६९९ **४** | २५८ **५** | २७७ **६** | ३४५ **२** | ३७८ **८** | २८९ **९** |
| २६६ | ३५७ | ३३० | ४८० | २३३ | ३६० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज
४ - ६ - ८ - ५ - ७

जबरदस्त पास होणारे चान्सेस
प्रो. बालाजी कुमार 9822486034


## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस चढ-उतारांनी भरलेला असेल. कामाच्या गडबडीत आरोग्याकडे लक्ष द्या. सकाळी चांगली बातमी मिळाल्याने तुम्ही उत्साही राहाल. इतरांच्या टिप्पण्यांमुळे मन:स्थिती बिघडू देऊ नका.

**वृषभ :** आज मालमत्तेशी संबंधित बाबींमुळे तुम्हाला फायदा होण्याची शक्यता आहे. तुमच्या कुटुंबाशी तुमचे संबंध आज प्रेमळ राहतील. आजचा दिवस कौटुंबिक वातावरणात जाईल.

**मिथुन :** व्यवसायात अडथळे येतील, पण योग्य लोकांच्या मदतीने ते दूर होतील.बाहेरचे खाणे पचनक्रिया बिघडवू शकते. व्यावसायिक प्रतिस्पर्धकांपासून सावध राहा.

**कर्क :** परिसरातील वादांपासून दूर राहा. संध्याकाळ कुटुंबासोबत शुभ वातावरणात जाईल. कोणत्याही मालमत्तेच्या व्यवहारात अत्यंत काळजीपूर्वक काम करा. कागदपत्रे पडताळून पाहणे आवश्यक आहे,

**सिंह :** आजचा दिवस खूप अनुकूल असेल. तुमच्या प्रेम जीवनात छोट्या गोष्टींवरून वाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बोलताना जपून बोला. अनपेक्षित खर्चापासून स्वत:ला सावध ठेवा.

**कन्या :** प्रत्येक कामात यश मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या कुटुंबाला दिलेली वचने लक्षात ठेवून ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. लहान मुलांसोबत वेळ घालवल्याने आनंद मिळेल.

**तूळ :** तुम्ही तुमच्या पालकांसोबत एखाद्या शुभ समारंभाला किंवा कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. नोकरी करणाजयांना त्यांच्या मेहनतीचे फळ म्हणून चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** प्रवास करताना आपल्या वस्तूंची आणि स्वत:ची काळजी घ्या. तसेच प्रवासाचे नियोजन व्यवस्थित करा. पाहुण्यांच्या आगमनाने कुटुंबातील वातावरण हलके होईल.


**धनु :** आपले खर्च कमी करा. तुमच्या बजेटमध्ये राहूनच व्यवहार करा. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. ज्यामुळे तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. आईसोबत नातेवाईकाकडे जाण्याची शक्यता आहे.

**मकर :** कुटुंबाच्या मदतीने वैवाहिक जीवनातील तणाव संपू शकतो. आईसोबत नातेवाईकाकडे जाण्याची शक्यता आहे. मित्रांसोबत डिनरची योजना आखू शकता.

**कुंभ :** आजचा दिवस कौटुंबिक वातावरणात जाईल. कुटुंबाच्या मदतीने वैवाहिक जीवनातील तणाव संपू शकतो. आईसोबत नातेवाईकाकडे जाण्याची शक्यता आहे. लग्नाच्या चर्चा पुढे सरकण्याची शक्यता आहे.

**मीन :** आजचा दिवस काही आव्हानांनी भरलेला असला तरी तुमच्या आत्मविश्वासाने तुम्ही त्यावर निश्चितपणे मात कराल.तुमच्या कुटुंबाच्या सल्ल्याने तुम्ही कोणताही नवीन प्रकल्प सुरू करू शकता.

## शब्दकोडे क्रमांक २२९९




**आडवे शब्द :-**
१) उमेदवार निवडणारे मंडळ
५) नियमित यात्रेला जाणारा
७) विश्वासघात
९) कौतुक
१०) प्रजा
१२) गाय
१३) वितरण
१५) समुद्रातील अग्नी
१८) राजबिंडा, तेजस्वी
२०) प्रामाणिक
२१) सरस्वतीचे एक नाव
२२) चरण
२३) पुढे जाण्याची तीव्र स्पर्धा
२५) मनावर ठेवलेले बंधन
२७) राक्षस
२९) फळातील द्रव
३१) रक्त देणे
३२) ओरखडा
३४) स्त्री, बाई
३५) तंबूची कापडी भिंत
३८) पोळ्या भाजण्याचे पात्र
३९) चंद्र
४०) नामशेष
४३) आवाज, नाद
४५) एक श्वासरोग
४७) कपाळभर लावलेले कुंकू
४८) समोरासमोरची लढाई
५०) दक्ष
५१) मालक
५३) पृथ्वी
५५) सापाची एक जात
५७) आईवडील
६१) वाचणारा
६२) विष (हिंदी)
६४) रस्ता, मार्ग
६५) उष्ण
६७) रक्षण करणारा
६८) वितरण करणारा
६९) जीभ

**उभे शब्द**
१) निर्लज्ज
२) पारंब्यांचे झाड
३) समतल
४) नदीची एक बाजू, काठ
५) कडक आणि चिवट
६) अर्धवर्तुळाकृती आकार
८) अवयव, इंद्रिय
११) गवत
१३) गंध
१४) संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
१६) बातमीदार
१७) छोटा, लहान
१९) श्वापद, पशू
२१) नक्षीदार तंबू
२४) चर्चा
२६) रक्तरंजीत
२८) तोंडी व्यवहार
३०) सर्वस्व
३३) रात्र
३५) मध्यस्थ
३६) भोळा माणूस
३७) हात
४१) सुंदर तरुणी
४२) घालवणे (संधी वगैरे)
४४) यज्ञ
४६) मत्स्य, मीन
४९) कंपासमधील दोन टोकांचे साधन
५१) मर्यादा, सीमा
५४) एक कोल्हापूरी दागिना
५५) दहावी रास
५६) धोबी
५८) बाजेची कापडी पट्टी
५९) मोठे गाव
६०) रुचीहीन
६३) सूर्याचे एक नाव
६६) मज्जाव, बंदी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# सात कोटींची गादी!




बरेच लोक गादीशिवाय झोपू शकत नाहीत. त्यामुळे ते दुसऱ्या बेडवर झोपू शकत नाहीत, तर काही लोक त्यांच्या गाद्यांबाबत खूप चोखंदळ असतात आणि त्यांना आरामदायी झोप देणारी गादीच खरेदी करायची असते. साधारणपणे, एखादी गादी खरेदी करताना, त्या गादीची स्प्रिंग चांगल्या स्थितीत आहे की नाही, लेटेक्स आणि फोम खराब आहेत का वगैरे, हे लोक काळजीपूर्वक तपासतात. कारण या सर्व गोष्टींमुळे आरामदायी झोप मिळू शकते. कितीही आरामदायी असली, तरी गादीसाठी कोणी सात कोटी रुपये खर्च करेल का ?

मुंबईतील एका इंटेरियर डिझायनर महिलेने इंस्टाग्राम या 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यात एक आलिशान गादी दाखवण्यात आली आहे. त्या गादीची किंमत आहे, तब्बल ७ कोटी रुपये. ती ऐकून सगळेच अवाक झाले आहेत. हेस्टेन्स मुंबई हे उत्कृष्ट स्वीडिश कारागिरीबरोबरच हस्तनिर्मित बेडसाठी प्रसिद्ध आहे. १८५२ मध्ये स्थापन झालेला या ब्रँडने राजकारण्यांपासून अनेक सेलिब्रिटींपर्यंत सर्वांसाठी बेड तयार केला आहे.

या गादीला गाद्यांमधली रोल्स रॉयस असे नाव देण्यात आले आहे. ही गादी फक्त हाताने बनवली जात नाही, तर ती एक गादी बनवण्यासाठी अतिशय कुशल कारागीरांना ३०० तासांपेक्षा अधिक कालावधी लागतो. तसेच या गादीत कापूस तसेच माणसाचे आणि घोड्यांचे केस भरलेले असतात.

**गादीवर घामच येत नाही**

दरम्यान इंटीरियर डिझायनरने स्पष्ट केले, की गादीतील घोड्याचे केस केवळ दाखवण्यासाठी नाहीत. ते नैसर्गिक व्हेंटिलेशन साधतात, म्हणजेच त्यामुळे हवा खेळती राहते. त्यामुळे गादीत कधीही उष्णता जाणवत नाही. म्हणूनच या गादीवर झोपल्यावर तुम्हाला कधीच घाम येणार नाही. फोम, लेटेक्स किंवा सिंथेटिक्सपासून मुक्त असलेली ही गादी पूर्णपणे नैसर्गिक साहित्याने बनवली असून त्यामुळे आपल्या त्वचेला योग्यपणे श्वास घेता येतो. असेही म्हटले जाते, की हे गादी कालांतराने तुमच्या शरीराशी जुळवून घेते. तुम्ही त्यावर जितका जास्त वेळ झोपाल तितकेच ते चांगले वाटेल.



## कॅलिडोस्कोप

# माशीमुळे येतं अंधत्व

या पृथ्वीतलावर चित्रविचित्र घटना घडत असतात. इथल्या एका गावातली सर्व माणसं अंध आहेत. इतकंच नाही तर पशूपक्षीही अंध आहेत. इथले पक्षी उडूही शकत नाहीत. उडल्यानंतर दिसत नसल्यामुळे झाडांना आपटून खाली पडतात. इथल्या प्राण्यांचीही अशीच अवस्था आहे. अंध असल्यामुळे त्यांना अन्न शोधताना खूप त्रास होतो. टिल्टेपक असं या गावाचं नाव आहे. या गावात जोपोटेक प्रजातीचे लोक राहतात. इथे जन्मलेली मुलं सुरूवातीला चांगली असतात. त्यांना दृष्टी असते. पण नंतर त्यांना अंधत्त्व येतं. हे गाव रस्त्याच्या लगत वसलं आहे.

या गावातल्या झोपड्या पाहिल्यावर आपल्याला आश्चर्याचा धक्का बसेल. या गावातल्या झोपडीला एकही खिडकी नाही. या गावात एकूण ७० झोपड्या आहेत. या लोकांना प्रकाशाची गरजच नसते. त्यामुळे झोपडीला खिडकीच नसते. इथले लोक दगडांवरच झोपतात. लावजुएजा नावाच्या झाडामुळे इथले लोक अंध असल्याचं बोललं जातं. या झाडाकडे पाहिल्यावरच अंधत्त्व येतं असं म्हणतात. याबाबत शास्त्रज्ञांना कळल्यानंतर ते या गावाकडे वळले. अर्थात या झाडामुळे कोणालाही अंधत्त्व येत नसून विशिष्ट प्रकारच्या माशीमुळे असं होत असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. चावल्यानंतर ही माशी माणसाच्या शरीरात विशिष्ट प्रकारचा द्रव सोडते. यामुळे माणसाच्या डोळ्यांच्या नसा बंद होतात आणि दृष्टी अधू होते. त्यामुळे इथल्या लोकांच्या अंधत्त्वाला झाड नाही तर माशी जबाबदार आहे.



# लॉटरीची बातमी पत्नीपासूनच लपवली!

ही गोष्ट जपानमधील टोकियो येथे राहणाऱ्या ६६ वर्षीय निवृत्त पुरूषाची आहे. नशिबाने त्याच्या आयुष्यात अचानक एक वळण घेतले. या वळणाने सर्व काही बदलू शकले असते; परंतु त्याने ते कोणाशीही शेअर केले नाही, अगदी त्याच्या पत्नीशीही नाही. कारण हे जितके मनोरंजक आहे तितकेच विचित्र आहे.

एस नावाचा हा माणूस नेहमीप्रमाणे कॉफी शॉपमध्ये बसून वर्तमानपत्र वाचत असे. तिथे त्याने सहजगत्या २ डॉलर्स किमतीची काही लॉटरी तिकिटे खरेदी केली. त्याला फारशी आशा नव्हती, पण त्या तिकिटांपैकी एका तिकिटाने त्याचे नशीब पूर्णपणे बदलले. त्या तिकिटाला तब्बल ६०० दशलक्ष येन म्हणजेच ३.८ दशलक्ष डॉलर्स किंवा अंदाजे ३३ कोटी रुपये मिळाले. आता खरा मुद्दा असा होता, की तो या विजयाचा आनंद घरी का नेऊ शकला नाही? एस स्वतः स्पष्ट करतात, की त्याची पत्नी घराचे बजेट काटेकोरपणे व्यवस्थापित करत असे. प्रत्येक खर्चावर लक्ष ठेवले जात असे. खर्च कमी करण्यासाठी बिअर खरेदी करण्यासदेखील मनाई होती. अशा परिस्थितीत पत्नीला खरी रक्कम कळली, तर तो कदाचित ते पैसे हवे तितके वापरू शकणार नाही, असे एसला वाटले. हा विचार मनात ठेवून, त्याने सत्य लपवले आणि आपल्या पत्नीला फक्त एवढेच सांगितले, की त्याने ३२ हजार डॉलरची एक छोटी लॉटरी जिंकली आहे. ती लॉटरी घराची काही दुरुस्ती करण्यासाठी वापरली आहे, पण वास्तव वेगळेच होते.

इतक्या मोठ्या बक्षिसाने एसला स्वातंत्र्याची एक नवीन भावना दिली. दीर्घकाळ दडपलेले छंद, महागड्या वस्तू खरेदी करण्याची इच्छा आणि जग पाहण्याची तळमळ परत आली. पुढील सहा महिन्यांत, त्याने जवळजवळ एक लाख १६ हजार डॉलर लक्झरी वस्तूंवर खर्च केले. तो महागड्या सहलींवर गेला. एक महागडी कार खरेदी केली. शिवाय, कोणाला काही कळू नये म्हणून त्याने शहराच्या भूमिगत पार्किंग लॉटमध्ये त्याच्या गाड्या पार्क करण्यास सुरुवात केली. तो तिथे सावधपणे पोहोचायचा, त्याच्या चमकदार गाड्यांमध्ये चढायचा आणि परत यायचा. ते त्याचे स्वतःचे छोटेसे गुप्त जग बनले. असे म्हणतात, की एखाद्या व्यक्तीचा आनंद कितीही मोठा असला तरी, त्यात दुसऱ्या कोणाचा समावेश नसेल तर आनंद अपूर्ण राहतो. एसच्या बाबतीतही हेच घडले. तो जेव्हा जेव्हा प्रवास करायचा, तेव्हा तो इतरांना त्यांच्या कुटुंबासह आनंद घेताना पाहायचा. त्याच्या मनात एक वेदना निर्माण झाली. तो हा आनंद त्याच्या कुटुंबासोबत का शेअर करू शकत नाही, असा विचार करू लागला. एवढी मोठी रक्कम जिंकल्याचा आनंद पश्चात्तापात बदलू लागला. तो आनंद लपवण्याच्या प्रयत्नात तो स्वतःला एकटे पाडत आहे, असे त्याला जाणवले.

# वाहतुकीचे 'स्मार्ट' नियोजन



भारताची कोचिंग क्लासेसची राजधानी म्हणून राजस्थानमधील कोटा शहर विख्यात आहे; पण या शहरांने अजून एक विलक्षण टप्पा गाठला आहे. आतापर्यंत देशातील इतर कोणत्याही शहराने ही कमाल केली नाही. या शहरात आता ट्रॅफिक सिग्नलचा अडथळा नसेल. शहरवासीयांना लाल, हिरव्या, पिवळ्या दिव्याच्या तालावर नाचावे लागणार नाही. स्मार्ट नियोजन आणि नावीन्यपूर्ण पायाभूत सुविधांमुळे शहरातील पादचाऱ्यांना पण रस्त्यांवरून चालणे सोपे झाले आहे.

कोटाच्या 'अर्बन इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट'ने (यूआयटी) हा उपक्रम राबवला. विना अडथळा, न थांबणाऱ्या वाहतुकीसाठी नियोजन केले. एकमेकांशी जोडलेल्या रिंगरोडचे जाळे बांधले. पारंपारिक गर्दीच्या चौकांना बायपास करून या वाहनांना इच्छित स्थळी जाता येते. त्यामुळे त्यांच्या वेळेत आणि इंधनात मोठी बचत होत आहे. शहराची गतिशीलता आणखी वाढवण्यासाठी, शहरातील प्रमुख चौकात दोन डझनहून अधिक उड्डाणपूल आणि अंडरपास करण्यात आले. त्या माध्यमातून शहर जोडण्यात आले. या पद्धतीने सिग्नलवर थांबण्याची गरज उरत नाही. वाहनधारक विना विलंब सहज शहरात फिरू शकतात. परिणामी, प्रवास जलद तर होतोच; शिवाय अपघातही कमी होतात आणि इंधनाची बचत होते आणि प्रवास अधिक सुरळीत आणि पर्यावरणपूरक होतो.

कोटाचे उदाहरण आता इतर भारतीय शहरांसाठी एक आदर्श उदाहरण ठरत आहे. वाहतूक कोंडी आणि वाहतुकीच्या समस्येने ग्रस्त असलेल्या या शहराने काळजीपूर्वक शहरी रचना आणि पायाभूत सुविधा पुरवल्यास शहरवासीयांना वाहन कोंडीतून बाहेर आणता येते, हे दाखवून दिले. कोटामध्ये दररोज रहिवासी आणि हजारो विद्यार्थी प्रवास करतात. शहरात आता एक वाहतूक परिसंस्था तयारी झाली आहे. त्यामुळे त्यांचा प्रवास गतिमान झाला आहे. काही शहरांमध्ये रस्त्यांवरही अतिक्रमण आहे. मुख्य रस्ते, हमरस्ते आणि बाजारपेठेतील रस्ते, फुटपाथ हे सर्व अतिक्रमणधारकांनी गिळंकृत केले आहे. त्यामुळे या शहरात अंडरपास, ओव्हरब्रिज असूनही ट्रॅफिक जॅमची समस्या कायम आहे. अशावेळी अतिक्रमण काढून, वाहनधारकांना शिस्तीचे धडे देऊन अनेक शहरातील वाहतूक कोंडी कमी करता येऊ शकते. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक मजबूत केल्यासही खासगी वाहने रस्त्यावर येण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी आपोआप कमी होते असा धडा या शहराने दिला आहे.

# देशाच्या सुरक्षेसाठी महिला कमांडो!



मागील चार-पाच वर्षांपासून देशाच्या सर्व सीमाभागांमध्ये कमीजास्त प्रमाणात तणावाचीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. त्यातच भारत-चीनच्या सीमाभागात होणाऱ्या हालचाली आणि लष्करी कारवाया लक्ष वेधत आहेत. भारत आणि चीनची एकत्रित अशी ३४८८ किलोमीटर लांबीची दुर्गम आणि बर्फाच्छादित वास्तविक नियंत्रण रेषा (एलएएसी) आणि या भागाच्या संरक्षणाची जबाबदारी इंडो-तिबेटियन बॉर्डर पोलिस दलाच्या खांद्यांवर असून आता या दलाकडून सीमा भागात नवी तुकडी तैनात केली जाणार आहे. १९६२ ला स्थापन झालेले देशाचे हे सुरक्षा दल केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अखत्यारीत काम करते. एका लाखांहून अधिक मनुष्यबळ असलेल्या 'आयटीबीपी'च्या चौक्या ९००० फूट ते १४००० फुटांपेक्षा अधिक उंचीवर तैनात आहेत. त्यात महिलांचे भरीव योगदान येत्या काळात पाहायला मिळेल.

२०२० च्या लडाखमधील लष्करी संघर्षानंतर 'आयटीबीपी ने या भागात 'फॉरवर्डायझेशन' योजना सुरू केली असून, येथे येत्या काळात महिला सैनिकही देशाच्या संरक्षणासाठी तैनात असणार आहेत. भारत-चीन सीमभागात लवकरच पूर्णपणे महिलांच्या नियंत्रणात असणाऱ्या दहा सीमा चौक्या स्थापन करण्याचा निर्णय 'आयटीबीपी'ने घेतला आहे. या योजनेला प्रत्यक्षरुप देण्यासाठी आतापर्यंत २१५ सीमा चौक्या महत्त्वाच्या ठिकाणी हलवण्यात आल्या आहेत.

'आयटीबीपी'च्या या योजनेला बळ देण्यासाठी, केंद्राने २०२३ मध्ये 'आयटीबीपी'साठी ९४०० कर्मचाऱ्यांची भरती असलेल्या सात नव्या बटालियनसह एका सेक्टर मुख्यालयाला मंजुरी दिली. मागील काही वर्षांमध्ये 'आयटीबीपी'त महिलांचे वाढते योगदान पाहता लडाखमधील लुकिंग आणि हिमाचल प्रदेशातील ठांगी येथे पूर्णपणे महिलांद्वारे नियंत्रित दोन सीमा चौक्या स्थापन करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. यामागोमाग उर्वरित आठ चौक्याही देशाच्या सीमेवर लवकरच कार्यान्वित केल्या जातील

# खरबूज कारपेक्षाही महाग?

प्रत्येक फळाचे एक खास वैशिष्ट्य असते. प्रत्येक फळ आरोग्यासाठी लाभदायक असते, पण एखाद्या महागड्या कार एवढी किंमत असलेलं खरबूज कधी पाहिलं आहे का?

जपानमध्ये लागवड करण्यात येणारे फळ Yubari King Melon (यूबारी किंग खरबूज) जगातील सर्वात महागडे खरबूज आहे. हे फळ फक्त गोडव्याने आणि सुगंधाने नाही, तर किंमतीमुळे देखील जगभरात चर्चेत आहे. जपानमधील होक्काइडो (Hokkaido) प्रांतातील छोटं शहर Ykbari येथे लागवड करण्यात येणाऱ्या या खरबुजाच्या एका जोडीची किंमत ५ मिलियन येन म्हणजे २९ लाख रुपये आहे

साधारण दिसणारं खरबूज इतकं महाग का असेल? असा प्रश्न तुमच्या मनात देखील नक्कीच आला असेल. धझलरीळ घळपस चशश्रेप हे कोणते साधारण फळ नाही, तर या फळाची शेती खास प्रकारे केली जाती. फळाचा गोडवा, आकार किंवा चव कमी होऊ नये म्हणून प्रत्येक रोपावर फक्त एकच खरबूज लावलेले असते. फळाची लागवड पूर्णपणे हरितगृह नियंत्रित प्रणालीमध्ये केली जाते. तिथे तापमान, आर्द्रता आणि प्रकाश पातळी अचूकपणे राखली जाते. म्हणूनच प्रत्येक फळाचा आकार पूर्णपणे गोल असतो आणि त्याच्या सालीवर



नैसर्गिक जाळीसारखी रचना असते. त्यामुळे ते इतर खरबूजांपेक्षा वेगळे दिसते.

जपानमध्ये कोणाला सन्मान द्यायचा असेल तर महागडे खरबूज भेट म्हणून दिले जाते. जपानमधील लोकांसाठी फळ सन्मानाचे प्रतीक आहे, म्हणून या फळाचा दरवर्षी लीलाव होतो आणि श्रीमंत लोक हे फळ विकत घेण्यासाठी लाखो येन मोजतात. खरबूज फक्त खाण्यासाठी नाही, तर एक शाही अनुभवदेखील आहे. जगभरातील लोक खरबूज स्वस्तात विकत घेतात, पण जपानमध्ये हे खरबूज घेणे म्हणजे सन्मानाची गोष्ट आहे.




# कॅफे की प्राणी संग्रहालय?

तुम्ही एखाद्या कॅफेमध्ये गेलात. तिथे तुमच्या आवडीची कॉफी आणि खाद्यपदार्थ मागवले. या खाद्यापदार्थांचा आस्वाद घेण्याच्या तयारीत तुम्ही असाल आणि अचानक तुमच्या अंगावर अजगर आला तर? तसंच टेबलवर चित्रविचित्र प्राणी फिरताना दिसले तर? आपण जोरात ओरडू , कॅफेच्या बाहेर पडू. कंबोडियाची राजधानी नोम पेन्हमध्ये एक भन्नाट रेस्तराँ उघडलं आहे. या कॅफेत बसल्यावर आपण एखाद्या प्राणीसंग्रहालयात बसलो आहोत की काय असंच वाटून जाईल. इथे बसल्यावर तुम्हाला पक्ष्यांचा किलबिलाट ऐकू येईल. आजूबाजूला विविध प्रकारचे मासे बागडताना दिसतील. इतकंच नाही तर टेबलवर विंचू,खेकडे, साप फिरताना दिसतील. रॅटी ने या रेस्तराँचे मालक आहेत. सुरूवातीला इथे येणारे ग्राहक साप आणि इतर किटकांना घाबरत असत. पण हळूहळू त्यांना याची सवय झाली. आता तर इथे येणारे लोक चहाचे घुटके घेत घेत साप आणि इतर किटकांसोबत सेल्फीही घेतात. नोम पेन्हमध्ये मांजरांच्या थीमवर आधारित एक रेस्तराँ आहे. हे रेस्तराँ इथल्या लोकांमध्ये खूपच लोकप्रिय आहे. यावरूनच साप असलेले हे रेस्तरॉं उघडण्यात आलं आहे. अनेक लोक साप, विंचू अशा प्राण्यांना घाबरतात. पण लोकांची भीती दूर करण्याच्या उद्देशाने हे रेस्तराँ सुरू केल्याचं रॅटी ने यांचं म्हणणं आहे. या कॅफेमधले विविध प्राणी थायलंडमधून मागवण्यात आले आहेत. सापांच्या भितीमुळे इथे फार लोक येत नाहीत. पण आता लोकांमधली भिती दूर होऊ लागली आहे. हळूहळू या रेस्तराँचा व्यवसाय वाढेल अशी अपेक्षा आहे.

# सर्वात विषारी स्टोनफिश

समुद्रकिनाऱ्यावर बसून लाटांचा मनमुराद आनंद लुटणं अनेकांना आवडतं. पण समुद्राजवळच्या खडकांमध्ये बसून असा आनंद लुटणं जीवघेणंही ठरू शकतं. याचं कारण म्हणजे जगातला सर्वात विषारी जीव. स्टोन फिश हा जगातला सर्वात विषारी सजीव आहे. हा मासा एखाद्या दगडासारखाच दिसतो. त्यामुळे त्यावर पाय ठेवला तर हा मासा शरीरातून विष बाहेर टाकतो. या विषामुळे माणसाचा मृत्यू होऊ शकतो. या माश्यावर जेवढं वजन पडतं तेवढ्या प्रमाणात तो विष बाहेर टाकतो. हे विष इतकं वाईट असतं की त्यावर पाय जरी पडला तरी पाय कापून टाकण्याची वेळ येऊ शकते. आपल्या निष्काळजीपणामुळे मृत्यूही ओढवू शकतो. पाय पडल्यावर हा मासा अवघ्या ०.५ सेकंदात शरीरात विष बाहेर टाकतो. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोच हे विष आपला जीव घेऊ शकतं. या जगात चित्रविचित्र जीवांची कमतरता नाही. प्रत्येक वेळी नव्या सजीवांचा, प्रजातींचा शोध लागत असतो. त्यामुळे अशा सजीवांपासून आपण सावध राहायला हवं.





# हुंड्यात दिल्या भन्नाट वस्तू

लग्नप्रसंगी वधूकडून हुंडा मागण्याची कुप्रथा भारतात अनेक ठिकाणी आहे. हुंडा मागणं हा कायद्याच्या दृष्टीने अपराध असला तरी असे प्रकार समाजात घडतच असतात. पण हुंडा घेणं ही प्रथा फक्त भारतातच आहे असं नाही. तर जगातल्या अनेक भागांमध्ये प्राचीन काळापासून ही प्रथा अस्तित्त्वात होती. हुंड्यात पैसे, गाडी, बंगला, दागदागिने असं बरंच काही मागितलं जातं. पण हुंड्यात अनेक भन्नाट गोष्टीही देण्यात आल्या आहेत. फ्रान्समधल्या एका हेअर ड्रेसरने मुलीच्या लग्नात जावयाला संपत्ती तर दिलीच. पण मुलीच्या वजनाइतके साबणही दिले. स्कॉटलंडमध्ये एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. तेराव्या शतकात सर ह्युगो डे गिफर्ड यांनी जावयाला जादूचं नासपती हे फळ हुंडा म्हणून दिलं होतं. आपल्याला काही त्रास झाला तर आपण नासपती खराब करून टाकू. यानंतर नवऱ्या मुलाचं कुटुंब उध्वस्त होईल, असं या मुलीने सासरच्यांना सांगितलं होतं. या मुलीच्या पतीने कर्ज फेडण्यासाठी नासपती विकून टाकलं. यानंतर त्याच्या भावांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचं बोललं जातं. पोर्तुगालची राजकुमारी कॅथरिन ब्रिगांजाचं लग्न इंग्लंडच्या दुसऱ्या चार्ल्सशी झालं. त्याचवेळी पोर्तुगिजांनी गुजरातच्या बहादूर शाहकडून मुंबई जिंकली होती. कॅथरिनच्या लग्नात चार्ल्सला हुंडा म्हणून मुंबई बेट देण्यात आलं होतं. चीनमधले उद्योगपती वू रूबियानो यांनी २०१२ मध्ये मुलीचं लग्न केलं. यावेळी त्यांनी हुंडा म्हणून सोन्याने भरलेले चार बॉक्स, भरपूर रोख रक्कम आणि आलिशान गाड्या दिल्या होत्या.

# किती अधिकाऱ्यांना मी जेलमध्ये टाकतो...



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी सर्वश्रुत आहेत. त्यांनी अनेकवेळा अधिकाऱ्यांना फैलावर घेतल्याचे पाहायला मिळते. तसेच आता पुन्हा एकदा गडकरींनी सरकारी अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढले.

माझ्या राजकीय आयुष्यात माझ्याकडून आता चांगले रस्ते झाले आहेत, आता मी किती अधिकाऱ्यांना जेलमध्ये टाकतो, किती सस्पेंड करतो याचा रेकॉर्ड माझ्या हातून झाला पाहिजे आणि यासाठी मी देशात हात धुवून मागे लागलो आहे, असे म्हणत नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना इशारा दिला आहे.

नागपूर महापालिकेच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजन कार्यक्रमावेळी केंद्रीय परिवहन व रस्ते मंत्री नितीन गडकरी यांनी सरकारी अधिकाऱ्यांवर निशाणा साधला. जनतेला शिक्षा होते, पण जे अधिकारी नियमानुसार वेळेत काम करत नाहीत, त्यांचे काय करायचे? असा सवाल गडकरी यांनी उपस्थित केला.

तसेच यावेळी बोलताना त्यांनी नागपूर महापालिका आयुक्तांना देखील चिमटे काढले.

नितीन गडकरी म्हणाले, आपण जनतेशी प्रामाणिक राहिले पाहिजे, गोड-गोड बोलतात म्हणून कोणाचे ऐकायचे काही कारण नाही, जनता हीच मालक आहे, ह्यांची कामे झाली पाहिजे. जी व्यवस्था न्याय देत नाही, ती उखडून टाकली पाहिजे, असेही गडकरी म्हणाले. जी व्यवस्था सर्वसामान्यांना न्याय देत नाही, त्याला उखडून फेकले पाहिजे. मी काम केले नाही तर मुर्दाबाद करणे तुमचा अधिकार आहे, असे परखड मत गडकारींनी बोलून दाखवले.

आरबीआय चौक ते ऑटोमोटीव्ह चौकदरम्यानच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन सोमवारी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह अनेक अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

या रस्त्यांवर पुढील २५ वर्षांत एकही खड्डा पडणार नाही, असा ठाम दावा गडकरी यांनी केला. आधुनिक पद्धतीने रस्ते विकसित करण्यात येणार असून त्यामध्ये योग्य ड्रेनेज व्यवस्था, रुंद पदपथ, स्ट्रीट लाईट, सायकल ट्रॅक यांसारख्या सुविधा असतील.

नागपूर शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या गोल बाजाराचेही नूतनीकरण करण्यात येणार आहे.

मात्र, यासाठी रस्त्यावरील अतिक्रमण हटवणे अत्यावश्यक असून त्याबाबत महापालिकेने ठोस पावले उचलावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी बोलताना गडकरी यांनी महापालिका आयुक्तांशी केलेल्या एका गंमतीदार संवादाचा उल्लेख केला. मी आयुक्तांना नेहमी विनोदाने विचारतो की, तुम्हाला पुढील लोकसभा निवडणूक माझ्याविरोधात लढायची आहे का? कारण नागपूरला तुमच्यासारखा सहहृदयी अधिकारी दुसरा नाही, असे म्हणत त्यांनी उपस्थितांमध्ये हशा पिकवला.

राजकीय नेते अतिक्रमण थांबवण्याचा प्रयत्न करतात आणि अधिकारी अतिक्रमण हटवतात, मात्र नागपूरमध्ये परिस्थिती उलटी असल्याने शहरातील बहुतांश रस्त्यांवर अतिक्रमण दिसून येते, अशी टीकाही त्यांनी केली.

मानकापूर चौक स्टेडियम ते आरबीआय चौक दरम्यान उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाच्या डिझाइनबाबत गडकरी यांनी स्पष्टपणे चूक मान्य केली. ही चूक माझीच आहे, असे सांगत आरबीआय चौकात उतरणाऱ्या पुलाच्या जागेत बदल करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

## कोराडी वीज केंद्रात ओझोन वायू गळती
# १८ कामगार अत्यवस्थ



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :

कोराडी येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रात दुपारी एकच्या सुमारास गंभीर घटना होता होता टळली. औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील ७ क्रमांकाच्या ६० मेगा वॅट वीज निर्मिती केंद्रातील ओझोन वायूची गळती झाल्याने तिथे उपस्थिती कामगारांचा श्वास गुदमरला.

श्वासोच्छवास घेताना त्रास होत असल्याची तक्रार घेऊन कामगारांची प्रकृती अस्वस्थ झाल्याने तातडीने अलार्म सिस्टिम यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. श्वास गुदरमलेल्या सर्व कामगारांना तीन रुग्ण वाहिकेतून तातडीने इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. श्वास गुदमरलेल्या या १८ कामगारांपैकी कोणाचीही प्रकृती अत्यवस्थ नसून त्यांचा श्वास सामान्य केला जात असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

दुपारी १ च्या सुमारास काही कामगारांना पोट फुगल्यासारखं वाटत होते. दरम्यान त्यांना श्वास घेताना त्रास होत असल्याची तक्रार कामगारांनी केली. त्यामुळे तातडीने सर्वांना मेयोतल्या अपघात विभागात दाखल करण्यात आले. प्रशासनाने या बाबत मध्ये प्रशासनाला अलर्ट देत टीम तयार ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या. या घडामोडीत कोराडी औष्णिक वीज निर्मिती केंद्राने वायू गळती नेमकी कशामुळे झाली याचा तपास सुरू केला आहे.

## दरोडा व अपहरण गुन्ह्यातील आरोपींना अटक

■ महासागर प्रतिनिधी, वाशिम, दि. १५ :

नांदेड मधील रहिवासी असलेले औषधोपचार करणे कामी पेशंट घेवून जात असतांना सदर मोप गावा जवळ तिन चारचारी गाड्यानी सदरची गाडी अडवुन त्यामधील इसमांना जबर मारहाण करुन त्यांचे जवळी 22,000/- रु जबरीने काढून घेतल्याची घटना घडली होती.

स्थानिक गुन्हे शाखा वाशिम व पोलीस स्टेशन रिसोड येथील अधिकारी व पोलीस अंमलदार घटनास्थळी दाखल झाले. व आजुबाजुच्या जिल्ह्यातील दरोडा टाकणारी टोळी बाबत माहिती घेतली.

रिसोड पोलिसांनी आरोपी राहुल दिलीप म्हस्के व सतिश जाधव,आकाश गायकवाड नवरीमुलगी व एजंट नामे शांताराम कडुजी खराटे रा. मोहजा रोड यांना अटक केली आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पात सहअध्यक्ष पदाची निर्मिती
### मुख्यमंत्र्यांचे विश्वासू आमदार रणधीर सावरकर यांची वर्णी

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १५ :

राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा टप्पा दोन राबविण्यासाठी गठीत समितीमध्ये सुधारणा करून सहअध्यक्ष पदाची निर्मिती करण्यात आली. या पदावर भाजपचे विधिमंडळातील मुख्य प्रतोद तथा अकोला पूर्वचे आमदार रणधीर सावरकर यांची वर्णी लावण्यात आली आहे.

बदलत्या हवामानाचा शेतीवर होत असलेल्या प्रतिकूल परिणामांची तीव्रता कमी करून शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय फायदेशीर करण्यास सहाय्य करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सन २०१८ मध्ये राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात आला.



नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-१ राबविण्यात आल्यानंतर या प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या टप्पा-२ साठी १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या समितीच्या रचनेत सुधारणा करून सहअध्यक्ष पद निर्माण केले.

आमदार रणधीर सावरकर यांची सहअध्यक्ष पदी नियुक्ती करून नव्याने समिती गठीत करण्यात आली आहे. सुधारित नव्या सुकाणू समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे मुख्य सचिव असून सहअध्यक्ष म्हणून आमदार रणधीर सावरकर आहेत.

या समितीमध्ये नियोजन विभाग, वित्त विभाग, सहकार व पणन, कृषी विभाग, जलसंधारण विभाग आदींचे सचिव, प्रधान सचिव, अपर मुख्य सचिव तसेच आयुक्त कृषी विभाग, राज्यातील कृषी विद्यापीठांचे कुलगुरू यांचाही समावेश करण्यात आला आहे.

## बाई अडलीये म्हणूनच ती नडलीये!
## टॅगलाईन जीवंत करणारा आशाचा ट्रेलर प्रदर्शित

लोकंजन

काही दिवसांपूर्वी आशा चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला आणि चित्रपटाच्या बाई अडलीये म्हणूनच ती नडलीये या प्रभावी टॅगलाईनमुळे टीझरने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण केली. त्यात रिंकू राजगुरू साकारत असलेली आशा सेविका सायकलवर बसून गावागावांतील लोकांपर्यंत पोहोचते, अशी काही झलक दाखवण्यात आली होती.

या साध्या तरीही परिणामकारक दृश्यांनीच प्रेक्षकांच्या मनात आशाच्या प्रवासाबद्दल एक वेगळं कुतूहल निर्माण केलं. याच उत्सुकतेला आणखी उधाण आलं ते,.नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, ज्येष्ठ साहित्यिक आणि ९९व्या आखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील आणि लोढा फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजू मंगलप्रभात लोढाआदी मान्यवरांसह आशा सेविका यांच्या उपस्थितीत पार पडला.

महिलांच्या संघर्षांचा, त्यांच्या जिद्दीचा आणि समाजाशी सुरू असलेल्या लढ्यांचा संवेदनशील आणि वास्तववादी प्रवास आशामधून उलगडत जातो. ट्रेलरमध्ये रिंकू राजगुरूने साकारलेल्या आशाचे अनेक पैलू दिसतात.

गावोगावी लोकांच्या आरोग्याची जबाबदारी पेलणे, कुटुंबातील ताणतणावांना सामोरं जाणं, अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहाणं आणि स्वतःचं ध्येय साध्य करण्याची न थकणारी धडपड. तिच्या आयुष्यातील धग, वेदना आणि तळमळ ट्रेलरमध्ये स्पष्टपणे जाणवते.

रिंकूसह सायंकित कामत, उषा नाईक, शुभांगी भुजबळ, सुहास शिरसाट, दिशा दानडे, दिलीप घारे आणि हर्षा गुप्ते यांच्या भूमिका चित्रपटाला अधिक मजबुती देतात.



■ ■ ■

## गडचिरोलीच्या श्वेताचा दुबईत सुवर्णवेध!




■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १५ :

दुबई येथे नुकत्याच पार पडलेल्या पॅरा गेम्स २०२५ या अत्यंत प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत गडचिरोलीच्या श्वेता भास्कर कोवेने पॅरा आर्चरी या खेळात सुवर्णपदक पटकावत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आशिया खंडातील विविध देशांतील नामवंत आणि कसलेल्या पॅरा खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

चामोर्शी तालुक्यातील अनखोडा येथील सामान्य आदिवासी कुटुंबात जन्मलेल्या श्वेताने दुबई येथे झालेल्या आशिया युवा पॅरा गेम्स- २०२५ स्पर्धेत तिरंदाजी प्रकारात सुवर्णपदक पटकावत देशाची मान उंचावली. लहानशा घरात, मर्यादित साधनसुविधांमध्ये श्वेताचा संघर्षमय प्रवास सुरू झाला.

आर्थिक अडचणी, मूलभूत क्रीडा सुविधांचा अभाव आणि शारीरिक मयार्दा असूनही तिने हार मानली नाही. कुटुंबीयांचा विश्वास, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण सराव या बळावर तिने तिरंदाजीमध्ये प्रावीण्य मिळवले. पॅरा-ॲथलीट म्हणून कठोर प्रशिक्षण घेत श्वेताने राष्ट्रीय स्तरावर स्वतःची क्षमता सिद्ध केली आणि त्यातूनच भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली.

## पाच वर्षीय चिमुकलीवर परप्रांतीयाचा अतिप्रसंग
### लाखांदूर कडकडीत बंद : मुख्यमंत्र्यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १५ :

गत ९ दिवसांपूर्वी शहरात ५ वर्षीय चिमुकलीवर एका परप्रांतीयाकडून झालेल्या अतिप्रसंगा विरोधात लाखांदूर पेटून उठला असून त्या प्रसंगाविरोधात १५ डिसेंबर रोजी सर्वधर्मीय नागरिकांकडून लाखांदूर बंदचे आयोजन करण्यात आले होते.

या बंदच्या सुरुवातीलाच शिवाजी टी पॉइंट येथे उपस्थित गर्दीला संबोधताना काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, लाखांदूर पोलिसांच्या मध्यास्तीने हा वाद संपुष्टात आणून पुढे या मोचार्चे प्रस्तान झाले. आणि सवार्शेवटी चिमुकलीवर झालेल्या अत्याचारा विरोधात सर्वधर्मीय नागरिकांकडून काही मागण्यांचे निवेदन लाखांदूर तहसीलदारांमार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना देण्यात आले.

स्थानिक लाखांदूर शहरात ६ डिसेंबर रोजी अंगणात खेळत असलेल्या एका ५ वर्षीय चिमुकलीवर एका विधिसंघरशित परप्रांतियाने अतिप्रसंग केला. त्याचे विरोधात लाखांदूर पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून, त्याला अटक करण्यात आली असली तरी ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी आहे. त्यामुळे, या घटनेच्या आणि या प्रसंगाच्या विरोधात लाखांदूर पेटून उठले. याच्या निषेधार्थ आणि काही मागण्या घेवून १५ डिसेंबर रोजी सर्वधर्मीय आणि सर्व पक्षीय लाखांदूर बंद आणि मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

विधिसंघर्षग्रस्त आरोपी व त्याच्या कुटुंबियांना लाखांदूर तालुक्यातुन हाकलण्यात यावे व यापूर्वी देखील त्यानी केलेल्या गुन्ह्याच्या संबंधाने तपास करावा, पीडित व तिच्या कुटुंबायाला संरक्षण देण्यात यावे, विधिग्रस्त आरोपी बालक हा सराईत गुन्हेगार असल्याने पोलिसांनी त्याची जमानत होऊ देऊ नये म्हणून जलद गती न्यायालयात सदर प्रकरण चालवावे व शिक्षा होण्या संबंधाने आवश्यक ती कार्यवाही करावी, विधिग्रस्त आरोपीच्या कुटूंबाचे रहिवासी, आधार व राशन कार्ड हे बेकायदेशिर तयार करण्यात आले ते तात्काळ रद्द करण्यात यावे व सदर कागदपत्रे तयार करुण देणाऱ्या लोकप्रतिनिधीवर कार्यवाही करण्यात यावी, पीडित कुटुंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत व शासकीय नोकरी देण्यात यावी, रोजगार करणाऱ्या व सामान विकणाऱ्या व्यक्तींची मुशाफरी पोलिसांनी नोंदविण्यात यावी व त्यांची नोंद घ्यावी यासह अनेक मागण्यांचा निवेदनात समावेश असून, मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.

## मयसभा चित्रपटाचे फर्स्ट मोशन टीझर प्रदर्शित




मयसभा हा दिग्दर्शक राही अनिल बर्वे यांचा, तुंबाडच्या यशस्वी पदर्पणानंतरचा अत्यंत बहुप्रतीक्षित चित्रपट आहे. अत्यंत प्रभावी वातावरण निर्मितीबद्दल ओळखल्या जाणाऱ्या बर्वे यांनी पुन्हा एकदा मिथक, रहस्य आणि मानसिक गहनता असलेला विषय निवडला आहे आणि त्याभोवती तत्वज्ञान, तणाव आणि अनेक तपाशीलांनी समृद्ध असे एक दृश्यमान विश्व विणले आहे. त्यांची खास शैली आता अधिकच धारदार, गडद आणि वेधक झालेली दिसेल.

मयसभा प्रेक्षकांना एका अशा प्रवासाला घेऊन जाते, जेथे लपलेली सत्ये आणि शक्ती संरचना प्रथम दर्शनी वाटतात, त्यापेक्षा खूप जास्त भयावह आहेत. हा चित्रपट अशा एका प्रांतात धाडसी पाऊल टाकतो, जेथे प्रतिकात्मकता आणि रहस्य एक होतात आणि जेथे संवादांपेक्षा शांतता बोलकी होते.

■ ■ ■

जवळजवळ एक दशक प्रयोग, विकास आणि पुनर्निर्माण केल्यानंतर दिग्दर्शक बर्वे आता पुन्हा परतत आहेत- हा एक प्रदीर्घ सर्जनशील प्रवास आहे, ज्याने या चित्रपटाचा स्वर आणि रूप यांना आकार दिला आहे. मयसभा चित्रपट तुंबाडसारखा नाही, आणि तो तुम्ही आजवर पाहिलेल्या इतर कोणत्याही चित्रपटासारखाही नाही. मयसभा चित्रपटात, प्रेक्षक आणि चार व्यक्तिरेखा एकत्र मिळून प्रवास सुरू करतात- दोघांसाठी खजिन्याचा शोध एकाच क्षणी सुरू होतो. पण चित्रपट जसजसा पुढे जातो, तसा या पात्रांना येणारा अनुभव आणि प्रेक्षकांना येणारा अनुभव यामध्ये फरक पडू लागतो.

## नाताळच्या सुट्टीत येतोय प्रथमेश परबचा गोट्या गँगस्टर



राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक दिवंगत राजेश पिंजानी यांचा अखेरचा चित्रपट गोट्या गँगस्टर या चित्रपटाचा अनोखा टीजर लाँच करण्यात आला आहे. अवधूत गुप्ते यांच्या आवाजातील गोट्या भाय या गाण्यावरचा हा टीजर लक्षवेधी असून, नाताळच्या सुट्टीत २६ डिसेंबर रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

अन्नपूर्णा प्रॉडक्शन्स निर्मित गोट्या गँगस्टर या चित्रपटाची निर्मिती अन्नपूर्णा बिरादार, राजेश्री बिरादार, संदीप बिरादार आहेत, तर चित्रपटाची प्रस्तुतकर्ता आणि सहनिर्माता ऋतुजा पाटील, शिव लोखंडे आहेत तसेच असोसिएट निमार्ता शिवाकांत तिवारी आहेत.

राजेश पिंजानी यांनी लेखन दिग्दर्शन केलेल्या चित्रपटात उत्तम स्टारकास्ट पाहायला मिळणार आहे. प्रवीण तरडे, प्रथमेश परब, डॉ. मोहन आगाशे, श्रीकांत यादव, अश्विनी गिरी, भूषण मंजुळे, विनोद वणवे, ऐश्वर्या शिंदे यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका आहेत. मायानगरी मुंबईतील एका चाळीत राहणाऱ्या तीन मित्रांची गोष्ट गोट्या गँगस्टर या चित्रपटांतून उलगडणार आहे.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## महावितरणच्या ३१ अधिकाऱ्यांवर कारवाई
### विजबिलाच्या वसुलीत हयगय

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. १५ :

वारंवार आवाहन करूनही वीजबिलांचा भरणा न करणाऱ्या ग्राहकांवर महावितरणने कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे.

महावितरणने थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याच्या मोहिमेला गती दिली असून, एका महिन्याचे बिल थकीत असले तरी वीजपुरवठा खंडित करण्याची कार्यवाही महावितरणने सुरू केली आहे. थकबाकीचा आलेख सातत्याने उंचावत असल्याने महावितरणने आता कठोर उपाययोजना आखल्या आहेत. पण, आता वसुलीत हयगय करणाऱ्या महावितरणच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवरही कारवाई करण्यात येत आहे.

वीजबिलाच्या वसूलीसाठी जबाबदार धरत नोव्हेंबर महिन्याची डिमांडवसूल करण्यातही अपयशी ठरणाऱ्या महावितरण अमरावती परिमंडळातील ५ अधिकाऱ्यांवर कारवाई करत त्यांच्या पगारातून एक तृतियांश रक्कम कपात करण्यात आली असून २६ क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

वीजबिल वसूल करण्याच्या जबाबदारीतील निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा सूचक इशारा देत वीजबिल वसूली आणि वीज सेवेला प्राधान्य देण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

शंभर टक्के वीज बिलाच्या वसूलीवरच महावितरणचे अस्तित्व आहे. वीज बिलाची अपेक्षित वसूली होत नसल्याने ऑक्टोबर २०२५ अखेर अमरावती परिमंडळातील लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, पाणी पुरवठा योजना, पथदिवे आणि इतर वर्गवारीतील वीज ग्राहकाकडे एकूण ९०६ कोटी रुपए थकले होते.

यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ३६९ कोटी ७९ लाख आणि यवतमाळ जिल्ह्यातील ५३६ कोटी ५२ लाख रुपए थकीत बिलाचा समावेश आहे. परंतू नोव्हेंबर महिन्यात अमरावती ८९ कोटी ७६ लाख आणि यवतमाळ जिल्ह्यात ५५ कोटी ६९ लाख रूपयाच्या वीजबिलाची वसूली झाली. अद्याप ७५५ कोटी रूपयाच्या वीजबिलाची वसूली बाकी आहे.

वीजबिल वसूलीबाबत महावितरणने आक्रमक पवित्रा घेत धडक कारवाईला सुरवात केली आहे. यात थकबाकीदार वीज ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. शिवाय वीजबिल वसूलीबाबत हयगय करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावरही कारवाई करण्याच्या स्पष्ट सुचना मुख्य अभियंता यांनी दिल्या आहेत.

महावितरणच्या प्रत्येक महिन्याच्या डिमांडपेक्षा वसूली अधिक झाली तरच एकूण थकबाकी कमी करणे शक्य आहे. नोव्हेंबर महिन्याची डिमांडच वसूल न झाल्याने कारवाई झालेल्या आणि कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये अमरावती जिल्ह्यातील ४ आणि यवतमाळ जिल्ह्यातील २७ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या कारवाईमुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे